म. ग्रं. सं. ठाणे
विषय- काव्य
सं. क्र. ६६९.

REFBK-0002347

॥ ॐनमश्चंडिकाये ॥



REFBK-0002347

REFBK-0002347

# मराठ्यांचीं
# संग्रामगीतें.

कविः—दुर्गाप्रसाद आसाराम तिवारी,
मास्तर—जळगांव ( पूर्व खानदेश. )

( द्वितियावृत्ति, प्रती १०००. )

मुद्रकः—दत्तात्रेय गोविंद सडेकर
मालक—धनंजय मुद्रणालय—खानापूर.

( सर्व हक्क ग्रंथकर्त्याचे स्वाधीन आहेत. )

सन १९२३.

किंमत १० आणे.

हें पुस्तक दत्तात्रेय गोविंद सडेकर यांनीं खानापूर येथें
आपल्या 'धनंजय' छापखान्यांत छापिलें
व
दुर्गाप्रसाद आसाराम तिवारी, यांनीं जळगांव
पूर्व खानदेश येथें प्रसिद्ध केलें.

‘ तन्मित्रमापदि सुखे च समक्रियं यत् ’



कवि—केशव महादेव सोनाळकर.

## समर्पण

“ सुखाच्या आणि दुःखाच्या वेळीं समक्रिय राहतो तोच सन्मित्र. ” या कव्युक्तीला उज्वल करणाऱ्या जिवलगा ! तुला हें पुष्प आदरानें अर्पण केलें आहे.

तुझा—‘ प्रसाद. ’

बालोद्यान प्रेस, पुणें.

# आत्मनिवेदन.

**या** पुस्तकाची ही दुसरी आवृत्ति प्रसिद्ध करितांना समाधान वाटत आहे. **दीड वर्षांत** पहिली आवृत्ति संपली. **केसरी, स्वराज्य, राजकारण, प्रबोधन, लोकमान्य, मराठी-शिक्षक, विविध ज्ञानविस्तार, स्वयंसेवक** वगैरे नियत-कालिकांतून या पुस्तकाविषयीं रसिक अभिप्राय प्रगट झाले याबद्दल त्यांचे आभार मानले पाहिजेत.

या पुस्तकांत करुणरसापेक्षां **वीररसच** प्रमुखत्वानें वर्णिला आहे. वीररसाला 'उद्धवा शांतवन कर जा' ही चाल पोषक नाहीं असे कांहीं वाचकांचे उद्गार आहेत. उमरावतीच्या **विदर्भसाहित्य-संमेलनां**त, विजापूर येथील **इलाखा शि० परिषदें**त आणि **पुणें, मुंबई, ठाणें, जळगांव, धुळें** येथील संस्थांत मी हीं '**संग्रामगीतें**' ह्मणून दाखविलीं आहेत. तेथें जमलेल्या साहित्याचार्यांच्या मान्यतेकडे आक्षेपकांनीं लक्ष पुरवावें अशी विनंति आहे.

या दुसऱ्या आवृत्तींत इ० स० १८५७ सालीं स्वातंत्र्यार्थ रणकल्लोळ करणाऱ्या झांशीच्या **लक्ष्मी**चीं युद्धविषयक ४ प्रकरणें आणि **महांकाळी** (तोफ), **संताजीची घोडदौड** व '**हें शिर लववेना मातें**' अशीं ७ प्रकरणे जास्त घातलीं आहेत. पुस्तकाचा आकार दीडपट झाला तरी किंमत ६८ होती ती ६१० मात्र ठेविली आहे.

खानापूर **धनंजय** प्रेसचे मालक श्री० **दत्तोपंत खडेकर** यांच्या अखंड प्रेमानें व अमोल विश्वासानें ही दुसरी आवृत्ति देखील भाव न ठरवितांच त्यांजकडे छापावयास दिली आहे.

या पुस्तकाच्या समर्पणाला आप्पासाहेब **सोनाळकरांसारखे** जिवलग स्नेही लाभले; व साह्य करण्याला रसप्रिय वाचक मिळाले ह्मणून मला दुप्पट समाधान वाटत आहे.

मागील आवृत्तिप्रमाणेंच यावेळींही रसीक **वाचकांनीं** मला साह्य करून **महाराष्ट्रजनतेची** थोडीतरी **सेवा** करण्याची उमेद आणावी अशी नम्र विनंती आहे, ती त्या सर्वांतर-यामि **परमात्म्याचे** कृपेनें पूर्ण होवो.

ऱ्हस्वदीर्घाचे वगैरे कांहीं अल्पदोष आढळतील त्यांबद्दल वाचकांनीं ' हंसक्षीर ' न्यायानें सांभाळून घ्यावें. परमेश्वरकृपेनें तिसऱ्या आवृत्तीचा योग आल्यास त्यावेळीं सर्व सुधारणा करूं.

**जळगांव,**
बालिप्रतिपदा शके १८४५

रसिकनम्र.
**दु० आ० तिवारी.**

# विषयानुक्रमणिका.



| विषय | पृष्ठ. | प्रसिद्धीचें स्थान. |
|---|---|---|
| १ हिंदूंचा हिंदुस्थान ! .... | १ | राजकारण. |
| २ हें शिर लववेना मातें ! .... | ४ | आनन्द. |
| ३ मुसलमान बंधूंची हिंदु भगिनी ! | ७ | राजकारण. |
| ४ संताजीची घोडदौड. .... | ११ | महाराष्ट्रसाहित्य. |
| ५ द्या करीं जरा समशेर ! .... | १५ | लोकमान्य. |
| ६ शाहूची यवनी माता. .... | १९ | लोकमित्र. |
| ७ मोहरा इरेला पडला. .... | २४ | संदेश. |
| ८ कुंभेरीची भंबेरी. .... .... | २८ | प्रफुल्लता. |
| ९ कीर्तीचा ध्वज मळवीला. .... | ३६ | प्रफुल्लता. |
| १० स्वर्गांत भेट होईल. .... | ४२ | प्रफुल्लता. |
| ११ विजयाच्या द्वारीं अडला. | ४६ | ,, |
| १२ मुसलमान असलों ह्मणून काय हिंदूंशीं बेइमान होऊं ? .... .... | ५१ | राजकारण. |
| १३ गारदी कटोनी मेला ! ... | ५५ | राजकारण. |
| १४ विश्वास सोडुनी गेला. ... | ६० | विविध ज्ञानवि० |
| १५ गिलचा खाशानिशीं मारीन ! | ६४ | काव्यरत्नावली. |
| १६ धन्य जननि जनकोजीची. | ६८ | विविधज्ञानवि० ज्युबिली ग्रंथ. |
| १७ भाऊ ! भाऊ !!... ... | ७६ | विविधज्ञानवि० |
| १८ महांकाळी ( तोफ. ) ... | ८२ | लोकमान्य. |

| | विषय. | पृष्ठ | प्रसिद्धीचें स्थान. |
|---|---|---|---|
| १९ | वडगांवावरचा वीर. ... | ८६ | प्रमोद. |
| २० | एक काळ ऐसा होता. ... | ९१ | कर्मयोगी. |
| २१ | ,, ,, भाग २ रा. | ९३ | ,, |
| २२ | ,, ,, भाग ३ रा. | ९६ | प्रफुल्लता. |
| २३ | ,, ,, भाग ४ था. | ९९ | कर्मयोगी. |
| २४ | मर्दानी झांशीवाली. ... | १०२ | चित्रमयजगत्. |
| २५ | घनगर्ज. ... ... | १०९ | लोकमित्र. |
| २६ | फेकला तटाहुन घोडा! ... | ११३ | महा० शारदा. |
| २७ | काल्पीस करी कल्पांत! ... | ११७ | महा० शारदा. |
| २८ | केवळ देशाकरितां. .... | १२३ | भारतमित्र. |
| २९ | दास्य हेंच ना त्वद्ध्येय.... | १२६ | तरुण-भारत. |

ग्रं. क्र. 23470

# मराठ्यांचीं
# संग्राम-गीतें.

## " हिंदूंचा हिंदुस्थान. ! "



ब्राह्मण ब्राह्मणेतर वा—मुसलमान हिंदू जैन
पारशी शीख वा बौद्ध—भिन्नधर्मश्रद्धावान
आह्मीं भारत-भू—पुत्र—अंतरांत जाणूं खूण.
बंधु बंधु यांच्या कलहीं
जरि शिरला कोणी गेहीं
उसळुन बोलूं सारेही.
" पाय काढ गेहांतून?—हिंदूंचा हिंदुस्थान ! " १

" दोघांचें भांडण लाभ-तिसऱ्याचा, "—ही ह्मण ठावी
ना तुला, न मजला पोळी-कां श्वानाला घालावी ?
नीच-वृत्तीनें परहस्तीं-जन्मभूमि केवीं द्यावी ?
स्वर्गलोक सुरलोकांचा
पाताल नागलोकांचा
अभिमान तयांना त्यांचा
अमुचाही हा अभिमान-' हिंदूंचा हिंदुस्थान ' ! २

उन्नत त्या हिंदुकुशाला-हिंदिमहासागर त्याला
वा प्रचंड सिंधुनदाला-ब्रह्मपुत्र-नद जो त्याला
जा पुसा, तुह्मां ऐकाया-येईल श्रुतिवचमाला
जेथलें ज्ञान मिळवोनी
जाहलें जगत् सज्ञानी
यद्यशो-दुंदुभि श्रवणीं
ऐकाया येतो अजुन-हिंदूंचा हिंदुस्थान ३

जो हिमाचलानें शोभे-हिमगिरिही ज्यानें शोभे
जो भागीरथिनें साजे-भागीरथी ज्यानें साजे
जो भरतकीर्तिनें गाजे-भरतकीर्ति ज्यानें गाजे
धर्माच्या क्रांतीकालीं
विश्वनाथ वेळोवेळीं
प्रगटला जिथें जयशाली
कवण देश कीर्तिवान ?-हिंदूंचा हिंदुस्थान. ! ४

यत्कीर्ती-हंसी उठली-ब्रह्मलोकिं जाउन ठेली
वाहन जो हंस विधीचा-त्याशीं रत होउन वळली
येतांना स्वर्गंगेंत-ती प्रसूत साध्वी झाली

धवलांग चंद्र हा नोहे
हें तदंड विलसत आहे
पितृलोक जयावर मोहे
ऐसा सयश-संपूर्ण-हिंदूंचा हिंदुस्थान ! ५

भू-ग्रह-गोलाच्या भंवतीं-घेऊन उपग्रह-रूप
कां प्रदक्षिणा घालितसे-रजनीचा नाथ समीप
ज्योतिर्विद् ग्रहविद्ज्ञानी-कारणें वदोत अमूप
मज कारण वाटे एक
मणि महि-कंठांत सुरेख
भाळला तयास शशांक
तो मणी कोणता छान-हिंदूंचा हिंदुस्थान ! ६

भारत-भूमीच्या पोटीं-जाहला जयांचा जन्म
जाहल्या तदंकीं ज्यांच्या-शैशव-लीला संपूर्ण
हृदयांत खळाळे रक्त-पाहतां तिचें दुर्दैन्य
पुत्र ते तिचे झटतांना
जे पराभिलाषी त्यांना
छळिती त्या दुर्वृत्तांना
इतुकेंहि नसावें ज्ञान-हिंदूंचा हिंदुस्थान ! ७

## " हें शिर लववेना मातें !"



" बाळ **शिवबा** ! तुला आग्रहानें दरबारीं नेलें पण तेथें तूं सुलतानाला सलाम केला नाहीं; ऐकतें ! " असें वीर-माता **जिजाईनें** विचारल्यावरून **बालशिवाजी** ह्मणतातः—

*　　　　*　　　　*

होतात देऊळें नष्ट-होतात देवता भ्रष्ट
धेनु ब्राह्मण ओरडती धर्मावरती संकष्ट
न्याय नीति उरली नाहीं-सारेच भोगिती कष्ट
हा घोर मांडिला ज्यांनीं
त्यांच्या पुढतीं जावोनी
देशाभिमान सोडोनी
प्रेमाच्या मंगल माते !-हें शिर लववेना मातें ! १

तूं सांग ?-तुझ्या चरणाशीं-हीं तोडुन ठेविन मान !
तूं सांग ?-तात चरणाशीं-कापोनी ठेविन मान ! !
गोब्राह्मण यांच्या करितां-खड्गावर ठेविन मान ! ! !
परि परके सत्ताधारी
गृहिं शिरून झाले वैरी
बघतांच तयांना भारी
सक्रोध वृत्ति मम होते-हें शिर लववेना मातें ! २

मी ह्मणतां " नाहीं नाहीं "-दरबारीं नेलें आई !
जों आंत शिरोनी पाहीं-तों चढून गेली भुवई ! !
मुजऱ्याला हात न वाही-शिर लववूं शकलों नाहीं ! !
हें सिंहासन कोणाचें ?
हें वैभव तरि कोणाचें ?
काहूर मनीं प्रश्नांचें
अपहारी नृपसत्तेतें-हें शिर लववेना मातें ! ३

एकटाच रात्रीं बसतों-जन्मभूमिला आठवतों
ढळढळा आईगे ! रडतों-क्षणिं त्वेषानें संचरतों ! !
झोंपेंत देशबंधूंच्या-दुःखानें दचकुन उठतों ! ! !
बोलते भवानी " ऊठ ? "
बोलते जन्मभू " ऊठ ? "
' धर समशेरीची मूठ ! '
अवमानुन त्या आज्ञेतें-हें शिर लववेना मातें ! ४

देशाचा राजा नाहीं-राजनिष्ठ राहूं कैसा ?
धर्माचा राजा नाहीं-राजभक्त होऊं कैसा ?

उलट्या बोधाच्या गळिं हा-जीवाचा अडके मासा !
ज्या शिरीं भार देशाचा
ज्या शिरीं भार धर्माचा
कर्तव्यें वाहायाचा
विसरून देशधर्मातें-हें शिर लववेना मातें ! ५

स्वाभिमान सुटला ज्यांचा-देशभक्ति सुटली ज्यांची
कुलकीर्तीचा इतिहास-स्मृति देई न उज्वलतेची
वाढवोत ते ते शोभा-दास्याच्या दरबाराची
'उद्दाम' ह्मणो कुणि मातें
कीं करोत उपहासातें
परि जागोनी स्वत्वातें
हिंदद्वेषी तख्तातें-हें शिर लववेना मातें ! ६

सुलतान जाहला क्रुद्ध-उमराव जाहले क्रुद्ध
जातिवंत झाले स्तब्ध-जनकही होय हतबुद्ध
परि तुझी आणि अंबेची-शिरिं कृपा असावी शुद्ध
मावळचे जमउन भाई
स्थापीन मराठेशाही
हालवीन आदिलशाही
बोलतों सत्य जें गमतें-हें शिर लववेना मातें ! ७

# मुसलमान बंधूची हिंदु भगिनी !

## " सांभाळा प्राणविसावा ! "

रायगड किल्ला स्वाधीन करितांना **येसूबाईनें झुल्फिकरखानाच्या** बोलण्यावर विश्वास ठेवून बाल-**शाहूस** त्याच्या हवालीं केलें. त्यानेंही हातीं **कुराण** घेऊन तिला बहीण ह्मटलें व तें नातें शेवटपर्यंत पाळिलें.

* * *

वाजवून गेला डंका-शिवराज पितामह ज्याचा
धर्मासाठीं यज्जनकें-बाळि दिधला स्वप्राणाचा
यद्यशः सौरभीं रमुनी-गातील कवींच्या वाचा
नातु तो शूरवीराचा
पुत्र तो धर्मशूराचा
स्वामी या रायगडाचा
म्यां कैसा हातीं द्यावा? सांभाळा प्राणविसावा १

घालती पन्हाळीं वेढे-वेडे त्यांना ठरवोनी
छाती उडवीत जाणारा-शत्रूच्या छातीवरुनी
ठेंचून करी रांगोळी-रांगण्यावरी खेंचोनी
तो भीष्म महाराष्ट्राचा
समयोचित बलधैर्याचा
हा वंशज हाय! तयाचा!
लावितें हात मी दैवा ! सांभाळा प्राणविसावा २

मी सून बरें कोणाची ! जों विचार करित्यें चित्तीं

मी पत्नि वरें कोणाची ! जो प्रश्न ठेवित्यें पुढतीं
हा समय करूं देईना-मज मान खालची वरती
अबलांचे असातिल मानी
त्यांनींच मिशी ठेवोनी
मिरवावें 'पुरुष' ह्मणोनी
शूर धर्म शूरां ठावा-सांभाळा प्राणविसावा ३

जीवितेश्वराचा घात-वज्राघातच शिरिं गमला
सुकली न अश्रुची धारा-अद्याप पदर हा ओला
तों भोग पारतंत्र्याचा-वाढून पुढें हा आला
ऐशी न कोणती जननी
सुत अर्पि परांलागोनी
समरीं विश्वास धरोनी
अर्पितें जिवाचा ठेवा-सांभाळा प्राणविसावा ४

हा होइल राजविलासी-जन्मतां ज्योतिषी वदले
दीर्घायुषि होइल भोगी-रेखाशास्त्रज्ञ ह्मणाले
बसवील घडी राज्याची-संत साधु बोलुन गेले
सर्वांनीं शुभ वर्तविलें
हें अशुभ वदाया आलें
काळिज पोळोनी गेलें
तुमचाच आतां ओलावा-सांभाळा प्राणविसावा ५

भडभडून येतें पोटीं-दुःखाचें गरळ न साहे !
ओकूं कोणाच्या जवळीं-कोण प्रेमीजन आहे !
रोधून पाहतें कष्टें-परि मातृहृदय ना राहे

अंगावरतीं खेळविलें
कटिवरतीं घेऊन फिरल्यें
पाळण्यांत गाणें ह्मटलें
आतां आपण रक्षावा-सांभाळा प्राणविसावा ६

परवांच्या तुमुल रणांत-जैं हताश सैनिक झाले !
परतले गडकरी ऐसें-कोणी येउन सांगितलें !
सिंहासन सोडुन उठला-आरक्त करोनी डोळे !
शरिरिं असुनी सुकुमार
घेऊन ढाल तरवार
झाला युद्धास तयार
हा रणसिंहाचा छावा-सांभाळा प्राणविसावा ७

जोंवरी करीं तलवार-तोंवरी शत्रुशीं दावा
टाकून शस्त्र जो आला-त्याशीं न करावा कावा.
निर्धौतयशःपट ज्यांचा-प्रकटिती वीर सद्भावा
साम्राज्यधुरंधर त्यांच्या—
सत्यप्रिय असती वाचा
कृति करुन दाविती साच्या
बोललां तशी कृति दावा-सांभाळा प्राणविसावा ८

विश्वास न येता जरिही-जातिचे मराठे आह्मी !
मारतां मारतां मरतों-देशाच्या येतों कामीं !
खंजीर-युक्त ललनांचे-चमकते हात संग्रामीं !

विश्वासीं त्यजिला मान.
मानेंत घातली मान.
दोघांत ' राम रहिमान '
राखोनी आपुल्या नांवा-सांभाळा प्राणविसावा ९

जर असेल घात करावा आहेच उभें हें पोर
वचनभंग करणें चित्तीं-आहेच करीं समशेर !
होउंद्या. खानसाहेब ! सोक्ष कीं मोक्ष निर्वैर
मक्केचा वारा मजशीं
गुणगुणतो कीं कानाशीं
" झुल्फिकरखान विश्वासी."
आठवून तिथल्या देवा-सांभाळा प्राणविसावा १०

मुसलमान बंधू झाला-बहिण ती हिंदुधर्माची
हातांत कुराण-ग्रंथ वाहतो—शपथ तो त्याची
संकटांत एकी व्हावी-रीत ही हिंदुयवनांची
" हें कुराण बघ उचलोनी
मानिली तुला मी भगिनी
हो विशंक अंत:करणीं
सांगणें नको या भावा-सांभाळा प्राणविसावा " ११

# " संताजीची घोडदौड. "

**संभाजी** महाराजांच्या वधानंतर **येसूबाई** व **बाल-शाहू** मोंगलांच्या ताब्यांत सांपडले. रायगडची गादी जिंजीला गेली ! स्फुरण पावलेली मोंगलसेना ज्या त्या किल्ल्यावर हिरवें निशाण फडकावूं लागली ! ती वेळ मोठ्या आणीबाणीची होती. **धनाजी जाधव** व **संताजी घोर-पडे** या रणझुंजारांनीं आणि **प्रल्हाद निराजी** सारख्या राजकारणी पुरुषांनीं त्यावेळीं मराठी राज्याची इमारत कृत-निश्चयानें सांवरली. **संताजी घोरपड्यांनीं** आपल्या घोड-दळाच्या साह्यानें **औरंगजेबाला** किती बावरून सोडिलें होतें तें इतिहासज्ञास कांहीं सांगावयास नको.

*　　　　*　　　　*

तळहातीं शिर घेउनियां-दख्खनची सेना लढली
तरि विजयी मोंगलसेना-ना नामोहरम जहाली
पडली मिठि रायगडाला-सोडवितां नाहीं सुटली

राजरत्न राजाराम
कंठास त्यास लावून
जिंजीवरती ठेवून

परते सर सेनापतिची-घोडदौड संताजीची १

मिरजेवर पातशहाचीं-शहाजणें वाजत होतीं
हाणिल्या तयांवर टापा-फोडून टाकिलीं पुरतीं
मारिली टाच तेथून-घेतला पन्हाळा हातीं

तों कळलें त्या वीराला
जिंजीला वेढा पडला
पागा घेवोनी वळला
चौखूर निघे त्वेषाची-घोडदौड संताजीची २

झुल्फिकरखान लढवय्या-कातरलीं झुल्फें त्याचीं
धूळधाण केली तेथें-किति अमीर उमरावांची
उसळली तिथोनी मांड-मग त्या कर्दनकाळाची
जिंजीचा धुरळा मिटला
जालना प्रांतिं तो उठला
चोळितो शत्रु नेत्राला
गेली हां हां ह्मणतांची-घोडदौड संताजीची ३

वाजल्या कुठें जरि टापा-धुरळ्याची दिसली छाया
छावणींत गोंधळ व्हावा-" संताजी आया! आया! "
शस्त्रांची शुद्धी नाहीं धडपडती ढाला घ्याया
रक्तानें शरिरें लाल
झोंपेनें डोळे लाल
जीवाचे होती हाल
ऐशी शत्रूला जाची-घोडदौड संताजीची ४

' धों धों ' वाहे गिरसप्पा-त्याला प्रतिसारिल कोण?
' सों सों ' शिशिराचा वारा-रोधील तयाला कोण?
हिमशैल-खंड कोसळतां-त्याला प्रतिरोधिल कोण?
होता जो गंगथडीला
आला तो भीमथडीला

एका दिवसांत उडाला
करि दैना परसेनेची-घोडदौड संताजीची ५

पुरताच बांधिला चंग-घोड्यास चढविला तंग
सोडी न हयाचें अंग-भाला बरचीचा संग
नौरंगाचा नवरंग-उतरला जाहला दंग
तुरगावर जेवण जेवी
तुरगावर निद्रा घेई
अंग ना धरेला लावी
भूमीस खूण टापांची-घोडदौड संताजीची ६

न कळे संचरलें होतें-तुरगांसहि कैसें स्फुरण
उफळाया बघती वेगें-रिकिबींत ठेवितां चरण
जणु त्यांसाहि ठावें होतें-युद्धीं " जय किंवा मरण "
शत्रूचे पडतां वेढे
पाण्याचे भरतां ओढे
अडती न उधळती घोडे
ऐशी चाले शर्तीची-घोडदौड संताजीची ७

नेमानें रसद लुटावी-नेमाजी शिंदे यांनीं
हय गज सांपडती तितुके-न्यावे हैबतरावांनीं
वाटोळें सर्व करावें-आटोळे सरदारांनीं
" खाड खाड " उठती टापा
झेंपावर घालीत झेंपा
गोटावर पडला छापा
आली ह्मणती काळाची-घोडदौड संताजीची ८

चढत्या घोड्यानिशिं गेला—बेफाम धनाजी स्वार
करि कहर बागलाणांत ओली न पुशी समशेर
बसवितो जरब यवनांना-बेजरब रिसालेदार
वेगवान उडवित वाजी
तोंडावर लढतो गाजी
धाउन आला संताजी
पळती मोंगल बघतांची-घोडदौड संताजीची ९

नांवाचा होता ‘ संत ’-जातीचा होता शूर !
शीलाचा होता ‘ साधू ’-संग्रामीं होता धीर !
हृदयाचा ‘ सज्जन ’ होता-रणकंदनिं होता क्रूर !
दुर्गति ती संभाजीची
दैना राजारामाची
अंतरीं सर्वदा जाची
उसळे रणशार्दूलाची-घोडदौड संताजीची १०

मर्दानी लढवय्यांनीं-केलेल्या मर्दुमकीचीं
मर्दानी गीतें गातां-मर्दानी चालीवरचीं
कडकडे डफावरि थाप-मर्दानी शाहीरांची
देशाच्या आपत्कालीं
शर्थीचीं युद्धें झालीं
गा शाहीरा ! या कालीं
ऐकूं दे विजयश्रीची-घोडदौड संताजीची ११

# " द्या करीं जरा समशेर ! "

**संभाजीराजाच्या** वधानंतर ज्यांनीं महाराष्ट्राची पडती बाजू शर्थीनें सांवरली त्या **संताजी घोरपडे** व **धनाजी जाधव** या अतिरथी-महारथींचा पुढें बिघाड झाला ! **छत्रपति राजारामाच्या** अप्रसन्नतेनें संताजीच्या कपाळीं वनवास आला ! दुर्दैवानें रानोमाळ हिंडणारा हा दुर्दैवी वीर एका ओढ्यांत स्नान करीत असतां मारेकऱ्यांनीं त्याचा निर्दयपणें खून केला ! तो निःशस्त्र वीर शेवटपर्यंत त्यांस ह्मणत होता कीं,-" हातांत जरा समशेर द्या ! "

*　　　*　　　*

संकटीं महाराष्ट्राची—सांवरली बाजू ज्यानें
आवेशें घोडदळाचा-धैमान घातला ज्यानें
नौरंगशहाचे कळस-कापून आणिले ज्यानें
　　　तो संताजी दुर्दैवें
　　　स्वजनांच्या व्यक्तिद्वेषें
　　　सांपडला देह त्रासें
निःशस्त्र बोलला धीर-" द्या करीं जरा समशेर ! " १

अचलाच्या निर्झरतीरीं-अचल वीर उघडा होता
रक्तस्नानें करणारा—स्नानाला सजला होता
दबलेले उसळुन आले—पातकी घातकी घातां
　　　चमकला जरासा देहीं
　　　कमरेवरती कर जाई
　　　तरवार कटीला नाहीं
समयचतुर बोले वीरः—" द्या करीं जरा समशेर ! " २

जीवाची आशा नाहीं—मरणाची भीती नाहीं
शूर मृत्यु पृष्ठीं वाही—विजयाला संमुख पाही
कोंदल्या दिशा जरि दाही—लढतांना स्वर्गीं जाई
शिवनेरीच्या दासाचा
शिवशाहीच्या भक्ताचा
संग्राम पहा अंतींचा
वारावरी घाला वार—“ द्या करीं जरा समशेर ! ” ३

एवढा धनाजी शूर-मित्राचा शत्रू झाला !
सुविचारी राजाराम-कर्णदंश त्यासहि घडला !
प्रल्हाद निराजी एक-तोही परलोकीं शिरला !
कर्तृत्व जहालें फोल
भक्तीचें गेलें मोल
जीवितही झालें लोल
बाहूला चढला जोर-“ द्या करीं जरा समशेर ! ” ४

देशभक्त बंधू सारे-चुगलखोर झाले कैसे ?
बंधूला तोडायाला-मारेकरि बनले कैसे ?
जाति-रक्त प्राशायाला-हिंस्र पशू झाले कैसे ?
दगलबाज पापी चोर
आले होउन शिरजोर
जोडाया पातक घोर
जरि असाल सारे शूर-“ द्या करीं जरा समशेर ! ” ५

या संताजीचे घोडे-एकाच दमानें गेले
जींजीचे फोडून वेढे-गनिमास उधळुनी आले
घामानें डबडबलेले-कृष्णेला पाणी प्याले

त्या वाजींच्या गाझीला
गांठोनी एकांताला
कापाया सारे सजलां
पातला समय जरि घोर-" घ्या करीं जरा समशेर!" ६

घ्या भाला बरची पट्टा-घ्या लंगोर अथवा सांग
घ्या कट्यार गदका निमचा-घ्या लाठी कमठा-बाण
भरतांना तालिमखाना-घ्या योद्ध्याचा पाहून
दावेदाराचा दावों
तुम्हि शौर्य आपुलें दावा
वंशाला डाग न लावा
मज नको शस्त्रसंभार-" घ्या करीं जरा समशेर!" ७

युद्धाचीं नीतीतत्वें-अधमांना रुचलीं नाहीं
पापिष्ट खुनी हृदयांत-अल्पही दया ना राही
सक्रोध लाल-नेत्रांत-उरला न विवेकाहि कांहीं
दुष्टांचे सजले हात!
चमकला शूर देहांत!
सरकला हात दो हात!
करि घोष पाहुनी घेर-" घ्या करीं जरा समशेर!" ८

पुढच्यानें केला वार-हाताची केली ढाल!
मागचा घालतो घाव-दुसऱ्या हाताची ढाल!
उजवी डावीचा मारा-साहून उसळला लाल!
एकाला लाथेसरसा—
दुसऱ्याला ठोशासरसा—

पाडोनी तोडी फासा
त्वेषानें गर्जे वीर-" द्या करीं जरा समशेर ! " ९

जों वर्मीं बसला घाव-" जय छत्रपतीकी ! "—बोले
जों खंडित झालें गात्र-जय समर्थ सद्गुरु ! "—बोले
निःशस्त्र उभारुनि हात-" शिवशाहीकी जय ! "—बोले
बेदरद कसाई चोर
निःशस्त्रीं ज्यांचें वैर
शिर करिति धडाहुन दूर
वंदले पडतांना शीर-"द्या करीं जरा समशेर ! " १०

रिपुरुधिरानें देशाचा-ज्यानें धुतला हो डाग !
देशानें तद्रक्ताचा-लावून घेतला डाग !
घोरपडे वंशज घोर विसरले न हा दुर्भोग
संग्रामीं योद्धे जबरे
डाव्या हाताचे मुजरे
रायाला करिती सारे
तैं स्मरे वाक्य दरबार- ' द्या करीं जरा समशेर ! "११

व्यक्तिद्वेषाचें खूळ-जातिद्वेषाचें मूळ
देशोन्नतिच्या मार्गांत-हे मोठे उन्नत सूळ
महाराष्ट्राच्या भक्तांनों-काढा उपटून समूळ
जो देशभक्त जातीचा
जो शौर्यशाली वंशाचा
तन्मुखिं न विनंती वाचा
मागतो संकटीं शूर-" द्या करीं जरा समशेर ! " १२

# " शाहूची यवनी माता. "

**राजारामाच्या** मृत्यूचें वर्तमान **शाहूला** कळलें, त्यावेळीं त्याला अतोनात दुःख झालें. केव्हां ना केव्हां तरी काका आपली सुटका करतील अशी त्यास आशा होती, ती समूळ नष्ट झाली. आतां आपणास शेवटपर्यंत मोंगलांच्या अटकेंत रहावें लागणार या हृद्रोगानें त्याचें मनःस्वास्थ्य नाहींसें झालें व शेवटीं त्याला मोठा ताप येऊं लागला. **एसूबाई** व **बेगम** ( रोषनार ) साहेब फारच घाबरल्या. **बेगम** तर **शाहूचा** बिछाना सोडिनाशी झाली; व ती देवाची करुणा भाकूं लागली. **औरंजेबाला** ती गोष्ट कळली तेव्हां तो स्वतः **शाहूच्या** समाचाराला गेला व त्याच्या अंगावरून हात फिरवून ह्मणाला, तुमारा चिच्या मर गया उस्वास्ते तबियत बिघड गई ? " तुम् हमारे बेटीके बेटे हो. चिंता मत करो. तुमारा राज्य तुमकू देऊंगा. " पुढें बेगमेच्या अविश्रांत खटपटीनें **शाहूस** आराम पडला. ( गोगटेकृत शाहू म० चें चरित्र. पान २८. )

* * *

काकांचा ऐकुन मृत्यू-शाहूचा खचला धीर
आशेचा तुटला तंतू-मुक्तीची इच्छा दूर
शय्येवरि हृद्रोगानें-तनु झाली क्षणभंगूर
तो रायगडाचा कान्हा
येसूबाईचा तान्हा

तापांत कण्हत असतांना
तळमळते चिंतायुक्ता-रोषनार बेगम माता १

"ध्यास सोड वेड्या जीवा ?-भेटतील कैंचे काका
स्वातंत्र्य कोठचें दैवीं-बंदिवास ठरला पुरता
वागवो कसाही शाहा-तोच तात बंधू आतां
अंतरांत कढ दुःखाचे
नेत्रांत नीर शोकाचें
नुमटती शब्द शाहूचे
अधिक बिंदु गळती, पुसतां-रोषनार बेगम माता २

जन्मदात्रिला पाहातों-तों हृदय भरोनी येतें
प्रेमदात्रिला पाहातों-तों अखंड धारा गळते !
"रडुं नको, नको मज रडवूं-सांग काय तुजला गमतें ?
धर्माच्या पुत्रासाठीं
नौरंगशहाची बेटी
करिल शक्य साऱ्या गोष्टी"
समजावी तत्सुखानिरता-रोषनार बेगम माता ३

प्रीतीची सरिता जेथें-जातिभेद कुठचा तेथें ?
मायेचा सागर जेथें-धर्मभेद कुठचा तेथें ?
एकात्मभावना होतां-रक्तही वितळुनी जातें
ही दिव्य देवता नीती
जी साधुसंत आदरिती
ती निर्मल योषिज्ज्योती
दाखवी सुकीर्ती-विहिता-रोषनार बेगम माता ४

घालोनी आपुला हात-एसूबाईच्या कंठीं
भगिनीला भगिनी सांगे-ती समजूतीच्या गोष्टी
परि तिचाच दाटुन कंठ-फुटतां न शब्द तैं ओठीं
वत्सलता स्फुरत होती
प्रीतीला भाषा नव्हती
तिजसवें करी रुदना ती
कवण प्रीतीची वनिता?-रोषनार बेगम माता ५

" दुग्धाचा एकाहि घोट-बाळ कांहीं प्याला नाहीं
टाकिलें बळें तोंडांत-कंठांत उतरलें नाहीं
हीं पात्रांतिल पक्वान्नें-मज रुचतिल केंवी बाई! "
मस्तकीं ठेवुनी हात
अनिमिष त्याला पाहात
अश्रुचीं फुलें वाहात.
निकटीं बैसे दुःखार्ता-रोषनार बेगम माता ६

एवढें राजमंदीर-तिज अरण्य भासत होतें
उपभोग्य वस्तु असतांना-मन विषण्ण झालें होतें
नश्वरता बाणुन चित्तीं ऐश्वर्य न रमवि मनातें
रात्रंदिन बसुन उशाशीं
प्रार्थोनी परमेशाशीं
करि नाना उपचाराशीं
ती सम्राटाची दुहिता-रोषनार बेगम माता ७

शेवटचा सुटला घाम-वसनें तीं चिंब जहालीं!
देहास लावितां हात-शीतता दिसे आलेली!

नाडीला लाउन हात-हकिम मान खालीं घाली!
भेसूर दुःख तेव्हांचें
जननीचें कीं यवनीचें
वर्णावें तरि कोणाचें?
कष्टली तनूस न बघतां-रोषनार बेगम माता ८

स्वाभाविक अदय मनाचा-नौरंगशहा विख्यात
ही प्रीतिशील उपजावी-कन्या त्याच्या उदरांत!
कोळशांत हिरकणि जैशी-किंवा नलिनी चिखलांत!
काष्ठाला अंकुर फुटला!
दगडाला पाझर सुटला!
शाहा कळवळुनी आला!
थोपटीत होती पुत्रा-रोषनार बेगम माता ९

कठिण शैल द्रवतो चित्तीं-सरितेच्या प्रेमजलानें
मेघाला सुटती धारा-चमकतां वीज तेजानें
दिलीश्वर हळहळला तो-तैशा अंतःकरणानें
" अल्लानें खैर करावी
दख्खनचा राजा भावी
उपभोगो राज्य सुदैवी
दुहिता नच, कीर्ती सरिता-रोषनार बेगम माता " १०

सर्व सदय झाले होते-सर्वेशाहि निर्दय नव्हता
हरएक मंगलाकांक्षी-हरिही न अमंगल-कर्ता
सकलेच्छा-' संकट जावें '-सकलेशाहि संकट-हर्ता

एसुबाईचें सुकृत
निजलेलें उठलें हंसत
तरि बेगम होती जपत
झाली संजीवनि-मात्रा-रोषनार बेगम माता ११

वैभवावरी चढणारा-शौर्यकीर्ति गाजवणारा
अटकेवर बाहु-बलानें-जरिपटका नाचविणारा
बा ! अशा महाराष्ट्रा ! तूं यवनी मातेचा प्यारा
तत्स्मरण सदा तुज व्हावें
यवन सर्व बंधू-भावें
त्वां प्रेमानें कवळावे
शिकवुन गेली सच्चरिता-रोषनार बेगम माता १२

संग्रहालय

# " मोहरा इरेला पडला. "

## ( वसईचा वेढा )

इ० स० १७३९

मोठ्या तुमुलयुद्धांचे व अगदीं निकराच्या हल्यांचे अनेक प्रसंग महाराष्ट्राच्या इतिहासांत आहेत; पण त्या सर्वांत **वसईचा** वेढा अधिक महत्वाचा होय. किल्ला **पोर्तुगी-जांच्या** ताब्यांत असून तो सर करण्याचा **चिमाजी-आप्पांचा** निर्धार होता. किल्याच्या तिन्ही बाजूंस पाणी; जमिनीच्या बाजूनें सुरंग लावावे तों वरून **पोर्तुगीजांनीं आगीचा** वर्षाव करावा ! चार महिने झाले तरी किल्ला हातीं येईना तेव्हां एके दिवशीं **आप्पांनीं** आपल्या सरदा-रांस बोलावून सांगितलें कीं, " माझें डोकें तरी तोफेच्या तडाख्यानें उडवून **वसईच्या** किल्यांत जाऊन पडेल असें करा, ह्मणजे माझा हेतु पूर्ण होईल ! " अशाप्रकारें **आप्पासारखा** " मोहरा इरेला पडला, " हें पाहून, " सरदारांस चेव आला आणि त्यांनीं आगीचा मारा होत असतां वाळूंत चर खणून सुरंग लाविले. सुरंगांनीं खिंडार पडतांच " " हर हर महादेव " ह्मणून मराठ्यांनीं निक-राचा हल्ला केला आणि तटावर बावटा रोविला !

*           *           *

बेलाग दुर्ग जंजीरा-वसईचा किल्ला असला
दुस्मान ' फिरंगी ' तिथला-आटोपेना कोणाला
त्या सिंहाला पकडाया-भारतीय ' चिमणा ' सजला

गोऱ्याचा टोपीवाला
कोंकणचा पगडीवाला
लागली झुंज उभयांला
बुद्धीचा डाव उडाला-मोहरा इरेला पडला १

मर्द त्या मराठी फौजा-रणकीर्ति जयांच्या गाऱ्या
तळहातीं शिर घेउनिया-चालुनी तटावरि जाऱ्या
जणुं घोंगावत मधमाशा-मोहोळाला बिलगाऱ्या
कडकडाट वरुनी व्हावा
सारखा अग्नि वर्षावा
परि सिंहाचा तो छावा
परतेना हिंमतवाला,-मोहरा इरेला पडला २

बोलावुनि सरदारांना-तो समरधुरंधर बोले
शूरांनों ! वेढा घाया-चार मास होउनि गेले
आवडते कंठमणीही-कार्य काय त्यांनीं केलें ?
बेहिंमत जे असतील
परतोनी ते जातील
मी आहें निश्चयशील
जा कळवा श्रीशाहूला-मोहरा इरेला पडला ३

घालुनी उडी संग्रामीं-जिंकील भयंकर काळ
मी असा घेतला होता-एकेक निवडुनी लाल
मी तुह्मांस मानित होतों-शौर्याचे तेजोगोल
जाहली परिक्षा आजी
मति खिन्न जाहली माझी
ह्मणतील काय ते बाजी
जा कळवा कीं दादाला-मोहरा इरेला पडला ४

तोफेच्या तोंडीं मातें-बांधोनी उडवा हातें
शिर तुटुनी त्या आघातें-किल्ल्यांत पडूंद्या त्यातें
प्रीय मी जरी तुह्मांतें-पुरवा अंतिम इच्छेतें
ती निर्वाणीची वाणी
डोळ्यांला आणी पाणी
प्रत्येक वदे गहिंवरुनी
" इर्षेस वीर हा चढला-मोहरा इरेला पडला " ५

लागला विषारी बाण-सकलांच्या अंतःकरणीं
शस्त्रांस पोंचले हात-लढवय्यांचे फुरफुरुनी
उतरुनी रक्त डोळ्यांत-नजराही गेल्या फिरुनी
ध्वनि ' हर हर ' ऐसा झाला
पाठीच्या सुटल्या ढाला
बोलती सकल या बोला
" राखूं निज लौकीकाला-मोहरा इरेला पडला " ६

गोळ्यांच्या माऱ्या-खालीं-चर खोदोनी रेतींत
उडविले सुरुंगी बार-तट लोळविला मातींत
गर्जना एकदम झाली-पडलेल्या खिंडारांत
जों बांध तटाचा फुटला
तों सेनासागर सुटला
धैर्याचा किल्लेवाला
बंदुकीस भाला भिडला-मोहरा इरेला पडला ७

कदमाच्या पुढतीं कदम-चालले कदम सरदार
वारावरि करितचि वार-अनुसरले शूर ' पवार '
शिंद्याचा खंदा घोडा-चालला जणूं कीं तीर

बावटा धरुनि तोंडांत
भोंसला चढे जोमांत
आगीच्या वर्षावांत
सामना भयंकर झाला-मोहरा इरेला पडला ८

गरनाळी तोफा मोठ्या-धुंकार कराया सजल्या
घायाळ धडाधड खालीं-तनु कितिकांच्या धडपडल्या
छातीचे निघडे वीर-चिंध्या परि त्यांच्या झाल्या
पगडीची फौज हटेना
शत्रूची पकड सुटेना
तो विजयश्रीचा ‘ चिमणा ’
बेहोष होउनी लढला-मोहरा इरेला पडला ९

शौर्याची शर्थ जहाली-बावटा तटावरि चढला
जयनादानें वसईचा-दिग्प्रांत अहा ! दुमदुमला
पोर्तुगीज किल्लेवाला-आप्पांच्या शरणीं आला
राष्ट्राची वाढे कीर्ती
तो समय आणि ती मूर्ती
ठाके कवि नयना पुढतीं
आठवतां या वाक्याला-मोहरा इरेला पडला १०

# " कुंभेरीची भंवेरी "

सर्व उत्तरहिंदुस्थान काबीज करण्याच्या इराद्यानें इ० स० १७५४।५५ सालीं श्रीमंत **रघुनाथराव पेशवे** यांनीं **पुण्याहून** नगारे वाजविले! त्यांच्याबरोबर **मल्हारराव होळकर, जयाजी शिंदे, यशवंतराव पवार** वगैरे मातबर सरदार होते. हा पेशव्यांचा दिग्विजयी काळ होता. **जयपूर, बिकानेर, कोटा** या संस्थानांतून खंडण्या घेत घेत मराठी फौज **सुरजमल्ल जाटाच्या** मुलुखांत शिरली. मराठ्यांनीं त्याजकडे एक कोट रुपये खंडणी मागितली; तो ४० लक्ष रुपये देण्यास कबूल झाला. मराठे ऐकतना. **जाट** चांगला सामर्थ्यवान् व लढवय्या होता. **कुंभेरीच्या** अभेद्य किल्यांत त्याचें ठाणें होतें. त्यानें ४० लक्ष रु० घ्या नाहीं तर युद्धास तयार रहा. असा निरोप देऊन बरोबर ५ गोळ्या व दारूही पाठवून दिली.

मराठ्यांस मनस्वी अपमान वाटून त्यांनीं **कुंभेरीस** मोर्चे लाविले. **मल्हारराव होळकरासारखा** युद्धकलापटु सेनापति पुढें होऊन त्यानें खंदकांतून तोफा, **हस्तनाला** व **सुतरनाला** यांचा **कुंभेरीवर** मारा सुरू केला! **जाटांनींही** वरून आगीचा केवळ पाऊस पाडला! इतक्यांत **मल्हाररावाचा** एकुलता एक पुत्र-सति **अहिल्येचा** सौभाग्यतिलक **खंडेराव, जाटाकडील** जेजालेच्या गोळ्यानें मोर्चांत ठार झाला. पुत्र-दुःखानें भडकून गेलेल्या त्या कर्दन-

काळ वीरानें यमुनेच्या तीरीं त्याचें श्राद्ध करीत असतां घोर प्रतिज्ञा केली कीं, " **कुंभेरीची** माती खणून यमुनेंत टाकीन तरच जन्मास आल्याचें सार्थक्य ! "

**सुरजमल्ल जाट मल्हाररावास** ओळखून होता. **होळकर** आपली प्रतिज्ञा पूर्ण केल्याशिवाय राहणार नाहीं ह्मणून त्याला जरब बसली व तो घाबरला. त्याचा **रूपराम** नांवाचा एक मोठा राजकारणी मंत्री होता त्यानेंही **जाटास** तह करण्याची सल्ला दिली. **जाट** अर्ध-कोट रुपयांची खंडणी देऊन शरण आला ! **होळकरांच्या** नुसत्या जरबेनें " कुंभेरीची भंवेरी " उडाली ! शरण आलेल्यावर शस्त्र धरूं नये हें लक्षांत घेऊन त्या उदार सरदारानें त्यास सोडून दिलें.

* * *

दाक्षिणात्य शौर्याब्धीच्या-भरतीचा विजयी काळ
केंद्र-स्थल पुण्यपुरीचें-उठल्या लाटा विक्राळ
उत्तर विंध्याद्रीपुढचा-मुलख तो बिकट खडकाळ
जयपूर बिकानेर कोटा
यांच्या तुडवुनि गढ कोटां
जाटावर वळल्या लाटा
आली वेळा उडणारी-कुंभेरीची भंवेरी १

सरदारांच्या तोफांचे-कोटाला मोर्चे भिडले
सुटती गोळ्यावर गोळे-तटबंदी लेश न हाले
रेतीचें रणमैदान-यत्न ना सुरुंगी चाले

चावती मराठे ओठ
सांपडतां थोडी वाट
काढूं कापोनी जाट
उडवूं ह्मणती निर्धारीं-कुंभेरीची भंबेरी २

भाल्याच्या फाळावरतीं-बसवोनी जयलक्ष्मीला
दुंदुभीच्या ठेक्यावरतीं-नाचवीत शौर्यश्रीला
ढालेचा मिरवित हात-इंदुरचा गाजी आला
अभिमान सुभेदारीचा
विश्वासहि कर्तृत्वाचा
उचालिला विडा पैजेचा
उडवीन ह्मणे मल्हारी-कुंभेरीची भंबेरी ३

जोडी कर्णार्जुन यांची-किंवा अर्जुन भीष्माची
कीं सुरेंद्र इंद्रजिताची-इंद्रजीत सौमित्राची
वा रावण रघुनाथाची-रघुनाथ परशुरामाची
त्या रणतीर्थाच्या तीरीं
एकाला दुसरा भारी
जन ह्मणती " निश्चयकारी–
हा उडविल रिपुबलहारी-कुंभेरीची भंबेरी ! " ४

निर्भय संगर करणारा-छातीचा बांधुन कोट
कोटाला मारुन बगल-दारावर गेला थेट
' एळकोट ' करुनी चढला-फौजेचा घेउन गोट
हस्तनाळ गर्नाळांचा
सुतरनाल जेजालांचा
वर्षाव करुन अग्नीचा
चढवी उडवाया स्वारी-कुंभेरीची भंबेरी ५

घन गर्जे सुरजमल्ल[1]-हरिही मल्हारी[2] गर्जे
हेमंत-भानुसम जाट-हो ग्रीष्म-भानुसम साजे
तो नीळ शनैश्वर-तारा–हो मंगळ तारा शोभे
कुंजर जैसा नंदीला
कीं गरुड जणो हंसाला
तैसा भिडला जाटाला
उडवाया समरविहारी-कुंभेरीची भंबेरी ६

विजयाचें तोरण इकडे-अर्जुन हो बांधित होता
तिकडे सुत खंडेराव-अभिमन्यू झगडत होता
मोर्चांच्या चक्रव्यूहीं-जणुं भास्कर तळपत होता
अवतारच खंडोबाचा
उडवी भंडारा रिपुचा
तो कसचा परतायाचा
उडविल्याविना माघारी-कुंभेरीची भंबेरी ७

जाटांची कडवी जात-अन्नूला मरतिल सारे
दांतीं तृण धरतिल कसचे-जीवाला तृण गणणारे
मरतांना पडतिल उलथे-पाठ न परि दाखविणारे
त्यांनाच तयांची जननी
होई धन्य प्रसवोनी
तन्निश्चय गेला ठरुनी
" पाहूं कैशी उडणारी-कुंभेरीची भंबेरी " ८

१ कुंभेरीचा किल्लेदार. २ मल्हारराव होळकर.

कडकडाट इतका झाला-कीं असंख्य विद्युत्पात
इतुके गोळे सुटले कीं-जणुं ताऱ्यांची बरसात
इतुका उठला कीं धूर-जणुं घन जमले व्योमांत
पाहिला दरवाजा फुटला
दुसऱ्यावर हल्ला चढला
चिरडून तिथें वैऱ्याला
उडविण्यास घेई भरारी-कुंभेरीची भंवेरी ९

अपशकुनी डावा बाहू-तों एकाएकीं स्फुरला
जेजालेच्या गोळ्यानें-' खंडोजी ठार जहाला
ऐकतांच दुर्वार्तेला-हातांतुन भाला पडला
शव लावोनी पोटाशीं
गाळी अश्रूंच्या राशी
गमलें परकीय जनांशीं:—
विसरेल वाक्य मल्हारी-' कुंभेरीची भंवेरी ' १०

मारिला फणेवरि टोला-फाणि सूड न घेईल काय ?
छाव्याचा मुडदा बघुनी-संतप्त केसरी होय
जल-ओघाखालीं खळगा—पाडितां गर्जना होय
ज्याचा विजयी भुजदंड
शत्रूंची शमवित कंड
मिळवी जयकीर्ति अखंड
उडवील न काय करारी-कुंभेरीची भंवेरी ११

" त्वां माझें श्राद्ध करावें—मज तुझेंच करणें आलें
तव हस्त-तिलोदक घ्यावें-मी तुलाच घ्याया दिधलें !
सुत एकचि तूं होतासी—मत्सद्गति पुढची न कळे

दिसतो झाला निर्वंश
ज्यानें केला विध्वंस
छेदीन तयाचा वंश
उडवितों पहा अनिवारी-कुंभेरीची भंबेरी १२

ऐक गे! अहिल्ये! देवी! ठेवी न चितेवर पाय
तूंही विरहाची आग-मज लावूं नको गे हाय!
पितृतुल्य-स्वशुर विनंती-तूं अमान्य करिशिल काय?"
ती स्नुषा शीलकुलवान
परतवी तिला विनवून
येतों वदला उडवून
रिपुवंश हनन करणारी-कुंभेरीची भंबेरी १३

" कुंभेरीचा कुंभार-बसवीन गाढवावरती
चौमुलुख धिंड काढून-देईन यमाच्या हातीं
यमुनेचा बनविन गाळ-या कुंभेरीची माती
सार्थकता तरि देहाची
पूर्तताहि जनकत्वाची
त्यावीण शांतता कुठची
अजि उडेल संस्मृतिकारी-कुंभेरीची भंबेरी " १४

ऐकुनी प्रतिज्ञा उग्र-वायूही चित्तीं भ्याला
तव भरलीं शंभर वर्षं-सांगत सुटला जाटाला
मोठीच वावटळ उठुनी-गड पांडुरवर्ण जहाला
तरुवर उमळोनी पडले
घन विवर्ण होउन गेले

कीं उडवी आजाचि नकळे
ह्या भीष्म प्रतिज्ञाकारी-कुंभेरीची भंवेरी १५

घेतलें सतीचें वाण-परतेल न तो माघारीं
राहिला रभा बदलून-तो दहांस असतो भारी
तळहातीं शिर जो घेतो काळहि त्याला न निवारी
रूपराम मंत्री वृद्ध
राजनीति कुशल गुणज्ञ
स्वामीस करी सद्बोध
उडवील वीर इंदोरी-कुंभेरीची भंवेरी १६

" नांवच ऐकोनी घोडे-लाविती न मुख पाण्याला
थोपटून मानेवरती-पुसतात तुर्क तुरगाला
'क्या पानीमे दिखता है-मल्हारी भालेवाला ?'
ऐसा ज्याचा हो ! धाक
तो करील दौलत खाक
माराल मागुनी हांक
उडतांची हृदय विदारी-कुंभेरीची भंवेरी १७

कापून पुणें दरबारीं-आपटतां पद जोरानें
तो काबुलचा दरबार-दरकला उग्र भीतीनें !
तें सुलेमान तख्ताचें-हाललें शिखर कंपानें ! !
वेळीं न हुषारी धरिली
पगडी न जरी लववीली
तरि सर्वांशीं उडलेली
पाहुन येइल अंधेरी-कुंभेरीची भंवेरी १८

१ मल्हारीचें

ज्याच्या भाल्यावर निंबू-शेंदुर फांसोनी राही
निंबू कसचे राया !–तें वैऱ्याचें डोकें पाहीं
काळाचा दंड बघोनी-रक्ताचें पाणी होई
बुद्धीशीं वैर न आणा
हित वच सलतिल जरि कर्णी
तरि उडलेली बघतांना
डोळ्यांतुन वाहिल वारी-कुंभेरीची भंवेरी १९

राजस्थानाची भूमी-हयपदोत्कीर्ण झालेली
आर्यावर्ताची धरणी-वृकगृध्र-काकमय असली
अंतर्वेदीची क्षोणी-नररुधिरसिक्त बनलेली
यांकडे तरी पाहून
शक्ती अपुली जाणून
उडवा न गर्व वाहून
अंतर्यामीं सलणारी-कुंभेरीची भंवेरी २०

खंडणी अर्धकोटीची-देउन रिपु शरणीं आला
चरणीं लवलेल्यावरतीं-धरवे न शस्त्र कोणाला
शूरास दयेचीं शास्त्रें-लागतीं न पढवायाला
औदार्य मनाचें दावी
रक्तपात चुकवी भावी
नुसत्या जरबेनें उडवी
रिपुगर्व हनन करणारी-कुंभेरीची भंवेरी २१

# कीर्तीचा ध्वज मळवील.

## विषय-सूत्र.

" गिलचांच्या सरदारांनीं रोज रोज आमची रसद लुटावी, पठाणांनीं आमच्या सैनिकांचा धुव्वा उडवावा आणि आमच्या एकाही मराठे सरदारास या गोष्टीचा सूड उगवितां येऊं नये! ही मोठ्या नामुष्कीची गोष्ट आहे! आमचे कांहीं सरदार तर पोरवयाचेच आहेत; पण—" जनकोजी **शिंद्यानें** भाऊसाहेबांस पुढें बोलूंच दिलें नाहीं; तो ताडकन् उठून उभा राहिला आणि ह्मणाला—"कां हा रणसिंह शिंद्यांचा छावा स्वामीस तेजोहीन वाटला कीं काय? हा अस्सा जातों—आणि या म्यानांतून बाहेर काढलेल्या समशेरीचा प्रभाव दाखवून नंतर चरणाचें दर्शन घ्यावयास येतों." असें बोलून तो अठरा वर्षांचा फांकडा वीर भरदरबारांतून निघून गेला! **भाऊसाहेब** व त्यांचा तो दरबार त्या बालवीराकडे विस्मयपूर्ण दृष्टीनें पहातच राहिला!

हा तरुण वीर आपल्या बोलण्यानें इर्षेस चढून साहसास प्रवृत्त झाला हें ध्यानीं घेऊन प्रसंगीं मदत करावी व पाठ राखावी ह्मणून **बळवंतराव** गणपत **मेहेंदळे** यांस हुकूम सुटला! बळवंतराव व **जनकोजी** यांचें मनोमनीं चांगलें नव्हतें. मेहेंदळे आपली खास पागा घेऊन गेले. पण शिंद्यावर ऐन गर्दीच्या वेळीं एकजात ५०० पठाणी

स्वार तुटून पडले असतांही ते गिधाडासारखे घिरट्याच घालीत होते! मेहेंदळ्यांची हरामखोरी शिंद्याच्या तेव्हांच लक्षांत आली आणि त्या झटक्यांत तर तो अधिकच मर्दुमकीनें लढला.

विजयी होऊन रक्तानें भरलेली ती **जनकोजीची** बालमूर्ति आपल्या कंगणीदार पगडीला मिरवीत, घाम पुसीत दरबारांत ठाकली! तेथें मोठ्या जोरदार भाषेंत त्यानें मेहेंदळे यांचा पाजीपणा व्यक्त केला. **भाऊसाहेबांनीं** शिंद्याची पाठ थोपटून बळवंतरावास दोष दिला! गुडघ्यांत मान घालून बसलेले **बळवंतराव** घरीं येतात तों दारांतच उभ्या असलेल्या त्यांच्या पत्नीनें 'कीर्तीचा ध्वज मळवीला!' असें ह्मणून त्यांचा धिक्कार केला. घरीं दारीं चोहींकडे होत असलेल्या अपमानानें तो मानी पुरुष चिडून गेला. मळविलेला कीर्तीध्वज उजळून येईन नाहीं तर आपली "स्वर्गांत भेट होईल" असें पत्नीला सांगून त्यानें एकदम डंके वाजविले! ते ऐकतांच आपली खास तैनाती फौज घेऊन तो सरदारांचा सरदार **सदाशिवराव** भाऊ, **बळवंतरावा**च्या रक्षणाकरितां त्यांच्या पाठीशीं धांवून आला. स्वतः श्रीमंत भगवा झेंडा तोलीत आपणाकरितां येत आहेत; हें पाहतांच **बळवंतरावाचा** कंठ भरून आला! पुढें दोघांनीं **गिलच्या**बरोबर केलेला संग्राम येथें गद्यांत लिहिण्यापेक्षां तो पुढील पद्यांतच वाचिलेला बरा. त्या युद्धांत **बळवंतराव** पडले. भाऊसाहेब अत्यंत दुःखानें त्यांचें प्रेत घेऊन परत वळले. पुढें मेहेंदळ्याबरोबर त्यांची सत्यवचनी पतिव्रता स्त्री तिथेंच सती गेली!!

* * *

ह्मणतात काल स्वारीनीं-कीर्तीचा ध्वज मळवीला
आपण जनकोजी शिंदा-बालवीर तोंडीं दिधला
दुरुनीच घालुनी घिरट्या-गृध्रासम डोळा दिधला
मी महिंदळे वीरांची
वीर-पत्नि असतां साची
वार्ता दुर्लौकीकाची
मग कैशी ऐकूं बोला-कीर्तीचा ध्वज मळवीला १

ओठाच्या वरचें दूध-अजुनी न जयाच्या सुकलें
अठरा वर्षांचें पोर-झेंडे फडकावित आलें
रणशूर शिकंदर गाजी-ते माशा उडवित आले
व्यक्तिद्वेषाचा सूड
देशाच्या कार्यी मूढ
उगवितात मानारूढ
नुमगलें कसें स्वारीला-कीर्तीचा ध्वज मळवीला २

पांचशें पठाणी स्वार--शिंद्यावर येउन पडतां
एकटाच "हर! हर!" शद्बें-बेहोष होउनी लढतां
तुह्मि भीमासम लढवय्ये-तैं कोठें गेलां होतां?
कांकणें आह्मांसम हातीं
कां भरलेलीं तीं होतीं
दगडाची करुनी छाती
परतोनि कैसें आलां?-कीर्तीचा ध्वज मळवीला ३

रक्ताच्या कारंजांचे-तनुवरी फवारे बसले
घामाच्या धारा फुटुनी-मुखही डवडवुनी गेलें

त्या अपरंपार श्रमानें-तें म्लान जरासें झालें
ऐशी शिंद्याची मूर्ती
ठाकतां पेशव्या पुढतीं
" शाबास ! वाहवा ! " ह्मणती.
धिक्कार जाहला अपुला-कीर्तीचा ध्वज मळवीला ४

" उलटें काळीज जयांचें-कुलटे आह्मांसह होते
चोरटे दगलबाजीनें-धिरट्या घालित तें होते
उलटेल केधवा डाव-उलटे चिंतित ते होते "
शिंदे ऐसें रागांत—
वदतां भर दरबारांत—
घातली मान गुडघ्यांत !
निर्लज्ज कसे तैं झालां ?-कीर्तीचा ध्वज मळवीला ५

पाहतांच रणमैदान—रोमांच थरारुनि जावे
आवेश भरोनी अंगीं-छातीचे बंद तुटावे
हृदयाच्या ठोक्यासरसी-शरिरांत रक्त उसळावें
जे प्रळयकाळचे सांब
काळाला ह्मणतिल-' थांब ?
पळुं नको असा तूं लांब '
बळि पडले ते द्वेषाला-कीर्तीचा ध्वज मळवीला ६

ऐकुनी जयांचें नांव-अरि-शरिरीं कंप सुटावा
नौबतिचा ध्वनि दुमदुमतां-धैर्याचा दोर तुटावा
उसळुनी धडाडी घेतां-शेळ्यांचा कळप पळावा

ते काल ऐन समयातें
लावितां न कर खड्गातें
टकमक कां पाहत होते ?
मतिविकार कैसा झाला-कीर्तीचा ध्वज मळवीला ७

करकरीत कोरे कपडे-रक्ताचा डाग न एक
घमघमाट ये गंधाचा- घामाचा थेंब न एक
तरवार कटीला नाहीं-हातांत छडीचा झोंक
या ऐशा वेषें मजला
कां भुलवायाला आलां ?
भुलणारी नाहीं त्रिदुला
शौर्यावर पाडुन घाला-कीर्तीचा ध्वज मळवीला ८

स्वारी विजयाची माला-कंठीं येइल घालून
मी दारांतचि आनंदें-पंचारति ओवाळीन
राहुनी उभी शेजारीं-वरती पंखा वारीन
भोपळा भ्रमाचा फुटला
आशातरु दग्ध जहाला
मी सोडी निश्वासाला
ऐकिलें यदा वार्तेला-कीर्तीचा ध्वज मळवीला ९

दोषितात तुमचे तुह्मा-सरदार तसेचि शिपाई
गोटा-गोटांतुनि ऐका-किति निंदा चाले बाई !
उपमा देतात तुह्माला-"हे बारगिरांचे भाई !"
दुःशब्द कसे ऐकवती

अपमान कसे साहवती
कां वाटत नाहीं खंती
लाविला डाग वंशाला-कीर्तीचा ध्वज मळवीला १०

" हा बेहिमत्याचा मुलगा "-वदतील लोक बाळाला
" ही नामर्दाची दासी "-हिणवितील बाई मजला
" विश्वासघातकी, पाजी "-हीं विशेषणें तुह्माला
तुमच्या वडिलांची कीर्ती
दुमदुमते आर्यावर्ती
होती शौर्याची मूर्ती
मोठ्यांच्या पोटीं आलां-कीर्तीचा ध्वज मळवीला ११

एरंड उसाच्या पोटीं शेवाळ नदीच्या कांठीं
कीं आम्रफळाच्या पोटीं-निःसत्व असावी बाठी
कंटक पुष्पाच्या देंठीं-कांटे फणसाच्या पाठीं
कीं काच हिऱ्याच्या पोटीं
तुळशींत भांग उफराटी
अंधार रवीच्या पाठीं
तैसे जन्माला आलां-कीर्तीचा ध्वज मळवीला १२

आलांत तसें जा परतीं-हें तोंड न मज दावावें
घालून पालथे शत्रू-मातींत मिळवुनी यावें
पडलेला डाग धुवोनी-दासीला दर्शन द्यावें
जरि गेलां स्वर्गावरतीं
तनु ठेउनि सरणावरती
सेवीन येउनी वरती
जन बोलोत न या बोला-" कीर्तीचा ध्वज मळवीला " १३

## २ "स्वर्गांत भेट होईल."

भामिनी पुरें कर आतां-वाणीचें शर-संधान
त्वां जागविला हा सिंह-खुपसून विषारी बाण
दारूच्या कोठारास-लाविला अग्नि हा जाण
हो बाजूला चल दूर
गिलच्यांचा किति मगदूर
जरि दैवाचि झालें क्रूर
तरि शेवटचे हे बोल-'स्वर्गांत भेट होईल' १

स्मरुनी वडिलांचे पाय-वाहतों शपथ कीं साफ
पडला कीर्तीला डाग-तो करीन रुधिरें साफ
देणें पडलें देईन-प्राणाचें भरुनी माप
कां प्रबळ गजाचा छावा
अबलेनें धिक्कारावा
हा दुर्दैवाचा कावा
जर शेवटचाच असेल-स्वर्गांत भेट होईल २

ऐसाच जाउनी घेतों-समशेर आणि ती ढाल
बळवंतराव मी नाहीं-जाहलों पुरा वेताळ
एकची करोनी देतों-आकाश आणि पाताळ
रिपुपक्षाकडचीं भूतें
नाचवितों " थै थै " तेथें
आलों तर येइन येथें
अंतिम वा संगमकाल-स्वर्गांत भेट होईल ३

दुसऱ्यांचें साह्य कशाला-वनराज एकटा जातों
गर्जना फोडुनी मोठी-धडकी शत्रूला भरितों
झेंपेसरसी मेंढ्यांचा-फडशा पाडोनी येतों
कोल्ह्यांची गडबड काय
ठेवील न एकहि पाय
ह्मणतील जिवाला हाय
जरि दुर्दैवाचि उलटेल-स्वर्गांत भेट होईल ४

गर्वी षण्मुख बडबडती-थोपटती बाहू-दंड
गणपतिच्या बलवंताचा-पाहिला न शुंडादंड
बघतो मजसह लढती कीं-अजि कोण-कोणते षंढ
मी जीव तृणासम गणितों
हें नशीब ठोकुन जातों
जातांना तुजला वदतों
उलटेल जरी हा खेळ-स्वर्गांत भेट होईल ५

त्या रणदुल्लाख़ानाला-खेंचून आणितों पुढतीं
खिळखिळीं करोनी हाडें-वाघाला धरितों हातीं
मिरवीत आणितों येथें-बांधोनी हत्तीवरती
त्या कापाकापीमध्यें
येतिल जे पुढतीं योद्धे
पाडीन तयांचे मुर्दे
आलीच तशी जरि वेळ-स्वर्गांत भेट होईल ६

मी महिंदळे नांवाचा-गोंधळांत उडविन खटका
गांठून वजिर काबुलचा-हातानें मारिन झटका

मग बघेन येतो कोण-करण्याला त्याची सुटका
सिंहाच्या दाढेखालीं
एकवेळ जी सांपडली
वांचते कशाची शेळी
जरि निष्फल वच होतील-स्वर्गांत भेट होईल ७

मज मनःपूत निंदाया-ज्यांच्या जिव्हा चुरचुरल्या
धरतील जिभा दांतांत-लाविल्या जयांनीं चुगल्या
तोंडांत घालतिल बोटें-ह्मणतील ' कल्पना चुकल्या '
हे काना मागुन आले
शाहणे फारची झाले
उघडितों तयांचे डोळे
अवतार जरी संपेल-स्वर्गांत भेट होईल ८

अजवरी चकमकी झाल्या-पोरखेळ पोरांचे ते
हैदोस कसा घालावा-शिकवीन आज मी त्यांतें
कितिक्कांच्या विधवा दुःखें-लावितील कर भाळांतें
आकाशीं जी थरथरली
उतरेल भूवरी बिजली
जर असेल वेळाचि भरली
ज्योतींत ज्योत जाईल–स्वर्गांत भेट होईल ९

कटिवरतीं नाहीं बाळ-झोंपला काय नुकता तो ?
जागवूं नको ? झोंपूंदे-एक वेळ पाहुन घेतों !
कमरेस घालुनी विळखा- तो ह्मणेल ' मीही येतों '!

"जरी आलों बाळा ! परतीं
तरि घेइन मांडीवरतीं
नाहीं तर जेव्हां पुढतीं
कीर्ती मिळउन येशील-स्वर्गांत भेट होईल" १०

'येतों.'-थोड्यावेळानें-साध्वी ! कर्णा वाजेल
तास दोन तासांमध्यें-मोठी दंगल माजेल
ही पानपताची भूमी-नररुधिरानें रंगेल
तूं रहा बसोनी येथ
येतों जयघोष करीत
जरि फसले माझे बेत
मग ठरले अपुले बोल-'स्वर्गांत भेट होईल ! ११

तोडुनी पाश मायेचा-कर्मवीर निघुनी गेला
ती तटस्थ पाहत होती-निश्चल हरिणाक्षी विदुला
निज सौभाग्याचा लाल-तो दृष्टिआडही झाला
निश्वास सोडुनी ध्याई
'हे देवी ! अंबाबाई !
काळजी इकडची वाही
इच्छा जरि तवाचि असेल-'स्वर्गांत भेट होईल' १२

## ३ " विजयाच्या द्वारीं अडला !"

डंके नौबत रणवाद्यें-हीं कोणाचीं दुमदुमती ?
कोणाचीं निवडक पथकें-वळलीं कुरुभूमीवरतीं ?
हा महिंदळे सरदार-ज्या ' पंचहजारी ' ह्मणती !
शिंद्याचें वच ऐकोनी
अपमानानें जळफळुनी
आजि कमरबंद होवोनी
ललकारी ठोकित गेला-विजयाच्या द्वारीं अडला १

श्रीमंत सदाशिव भाऊ-सरदारांचा सरदार
पाठीवर धांवत आला-दासांचा पालनहार
त्या दिलदाराला बघुनी-गहिंवरुनी आलें फार
" कीर्तीचा ध्वज मळवीला
स्वामी ऐशा दासाला
कां परतविण्याला आलां ?
परतेल न चाकर अपुला-विजयाच्या द्वारीं अडला " २

" बळवंतराव ! ईर्ष्येनें-एकटे चालुनी आलां
सांभाळा आतां बाजू-लागेल डाग तोंडाला
भिडवितों बगल मी डावी-तुह्मि उजवीला सांभाळा "
तो गरुड भरारी मारी
भुज पक्षानें रिपु सारी
कितिकांना ठोके मारी
कलकलाट भारी केला-विजयाच्या द्वारीं अडला ३

बाणांच्या कैच्यावाले-धाडसी जंबुरेवाले
उडवीत आगिच्या ठिणग्या-आंगावर धाउन आले
भिडतां बाहूला बाहू-घाल्यावर पडले घाले
' मी मरेन वा मारीन
कीं कटेन वा काटीन
पण कीर्तीला उजळीन
ऐशा निर्धारें लढला-विजयाच्या द्वारीं अडला ' ४

तो ज्वालामुखिचा स्फोट-पाषाणहि द्रवुनी जावे
कीं प्रभंजनाचा लोट-उपटोनी वृक्ष पडावे
प्रक्षुब्ध अब्धिची लाट-मासे खळबळुनी जावे
होणारें होवो कांहीं
मागें ना परतुन पाहीं
तुडवीत शवांना जाई
चौफेर घेरला गेला-विजयाच्या द्वारीं अडला ५

भीषण शब्दांचे मेघ-पर्वतावरी घसरावे
मोठाल्या जल-ओघांनीं-सागरतीरीं नाचावें
कीं पतंग दीपाभंवतीं-चहुंबाजूंनीं झडपावे
धिप्पाड काबुली वीर
होउनी लाल अंगार
ठाकले कराया वार
फिरवी पाय न तरि अपुला-विजयाच्या द्वारीं अडला ६

एकटा वीर सगळ्यांशीं-झगडे मोठ्या निर्धारें
ढालेचा फिरवित हात-चुकवी खड्गांचे मारे

आले पठे धावोनी-जीवास जीव देणारे
खणखणाट मोठा झाला
रक्ताचा पाउस पडला
तो महिंदळा मरणाला
थोडाहि न चित्तीं भ्याला-विजयाच्या द्वारीं अडला ७

जाळ्यांत वाघ सांपडला-हें दुरून अवलोकोनी
भगवा झेंडा तोलीत-आला 'भाऊ[2]' धावोनी
नेटानें चढवुन हल्ला-घुसला तो फळि फोडोनी
तों योद्धा[1] हिंमतवान
पाही गर्दन वळवून
प्रेमाश्रू आले भरुन
दुप्पट अवसानें भरला-विजयाच्या द्वारीं अडला ८

मोहेरा[2] खुद्द स्वारीचा-जवळी आलेला दिसला
शत्रूसेनेचा डोळा-श्रीमंतांवरतीं फिरला
नरहरीच तो तंर होता-आंतड्याच फाडित गेला !!
तो प्रसंग पाहुन नयनीं
चावून ओठ दांतांनीं
पलटी घेवोनी त्यांनीं
"हर ! हर ! " ऐसा ध्वनि केला-विजयाच्या द्वारीं अडला ९

खरी चेंडू उसळावा-तैसा उसळे त्वेषांत
स्वामीच्या[2] भंवतीं फिरवी-गरगर पट्टयाचे हात
जणुं भरली होती वीज-त्या शूरांच्या[3] अंगांत

१ बळवंतराव मेहेंदळे. २ सदाशिवराव भाऊ.

पळसासम देहीं नटला
शेला कमरेचा सुटला
अवसर ना बांधायाला
रतला स्वामी सेवेला-विजयाच्या द्वारीं अडला १०

उंच उंच हिमगिरि शिखरें-देखावा पाहत होतीं
त्या अशुद्ध शोणित-सरिता-धों धों खालीं वाहाती
गंगा यमुना चळवळती-भूवरच्या पुण्यज्योती
नवबलाहकांच्या पंक्ती
कोलाहल ऐकुन भीती
गिरिशिखराला दृढ धरिती
ऐसा संग्रामीं लढला-विजयाच्या द्वारीं अडला ११

नामर्दाच्याही अंगीं-स्फुरवील चेतना मोठी
विजयश्री हांसत यावी-माला घालाया कंठीं
कर्तृत्व बघोनी शद्ब-आले भाऊंच्या ओष्टीं
" वा ! महिंदळे शाबास ?
द्या नीचांना गळफांस
कोंडून धरा अधमांस "
स्वामीवचनें सरसरला-विजयाच्या द्वारीं अडला १२

दैवानें केला घात-घातली झडप काळानें
खंजीर खुपसला पोटीं-गर्दींत कुणी पाप्यानें
भूमीवर उलथुन पडला-त्या प्राणांतिक घावानें
आरोळी एकच उठली
भाऊंच्या कानीं आली

तद्वाणी शोकें वदली
‘ कर्णासम योद्धा गेला ’-विजयाच्या द्वारीं अडला ! १३

तुटला स्वामीभक्तीचा-तेजस्वी सुंदर हार
सति सुलोचनेचा झाला-इंद्रजीत युद्धीं ठार
त्या मंदोदरिच्या नेत्रीं—लागेल अश्रुची धार
उलटा नशिबाचा वारा
वाहतां जिवाचा प्यारा
धरणीवर फेंकी शरीरा
तो काय करिल दैवाला-विजयाच्या द्वारीं अडला १४

तें प्रेत परत मिळवाया-प्रेतावर प्रेतें पडलीं !
परतले सदाशिव-भाऊ-बाप्पाला गाळित खालीं !
ती जखम स्वामिभक्ताची-स्वामीला बाधक झाली !
ह्मणती दैवाचे वादी
‘ पुढच्या नाशाच्या आधीं
अपशकुन घडोनी बाधी ’
हा शकुन तसा भाऊला-विजयाच्या द्वारीं अडला १५

# “ मुसलमान असलों ह्मणून काय हिंदूशीं बेइमान होऊं ? ”

पानिपताच्या संग्रामांतील मराठ्यांकडील प्रसिद्ध योद्धा **इब्राहिमखान गारदी**-ज्यावर **भाऊंचा** एवढा विश्वास कीं,—शेवटचा विजय मी खानाच्या तोफांवर मिळवीन !-त्याला जातीच्या नांवाखालीं आपल्याकडे वळवून घेण्याकरितां आदल्या दिवशीं रात्रीं **अहमदशहा अबदालीनें** आपल्या डोक्याची पगडी पाठविली व पगडी-भाई होण्यास सांगितलें ? त्या स्वामिभक्त शूरानें ती परत करून त्याच्याकडे मूठभर दारू मात्र पाठवून दिली ! !

*　　　*　　　*

पाठविली पगडी अपुली-करण्याला ‘ पगडी-भाई ’
प्रेमाची भाषा तव जी-भेदाची नीती तीही
निश्चय मम ढळला नाहीं-पण विचार आले कांहीं !
　　　पाजिलें जयानें दुध
　　　त्यावरी करोनी क्रोध
　　　कां विष ओकूं मी आज ?
स्वामीस घालुनी फासा—बेइमान होऊं कैसा ? १

उदगीरावरचा माझा-तो तोफांचा भडिमार
संगीनींची चतुराई-ती कडाबिनींची फेर
पाहुन जो आनंदानें-‘ धन्य ! धन्य ! ’ बोले वीर

'हाय' काय त्या वदवाया-
राज्यलोभ तव पुरवाया—
दुर्लौकिक घेऊं वायां?
जातीच्या मोहासरसा—बेइमान होऊं कैसा? २

व्यक्तीच्या स्वार्थासाठीं-कां देशाला बुडवावें?
जातीच्या मोहानें कां-जन्मभूमिला रडवावें?
नश्वर निज सौख्यासाठीं-कां एकीला फोडावें?
समर्थांच परीक्षा होते
शीलाला किंमत येते
चढवी शाश्वत कीर्तीतें
तो समय लाभतां ऐसा-बेइमान होऊं कैसा? ३

"आकाश फाडुनि खालीं-सैतान उतरुनी आला
"माझा 'इब्राहिम' असतां-काढीन भाजुनी त्याला
"बसवोनी तोफेवरती-पाठवीन निज-धामाला"
हा भाऊंचा विश्वास
मजविषयीं असतां, त्यास—
सोडाया लावूं श्वास!
हा नव्हे गारदी पेशा-बेइमान होऊं कैसा? ४

सजलेली दाढी माझी-भरलेला पीळ जियेला
पाहुन हात न जो लावी रुसलेल्यांच्या दाढीला
ताठ्यानें जातां जाट-जाईना परतविण्याला!
माझ्या संगीनी-वरती
दिसते ज्याला जयकीर्ती

त्यावरीच फिरवावी ती
शिवते न कल्पना सहसा-बेइमान होऊं कैसा ? ५

कोणती बगल भिडवावी-कोणता व्यूह फोडावा
आणीबाणीच्या वेळीं-मनसुबा काय ठरवावा ?
बोलावुन आधीं ज्यानें-खानाचा सल्ला घ्यावा ?
सरदारांचा सरदार
दिलदारांशीं दिलदार
माझ्यावर ज्याचा प्यार
विसरुन त्याच्या सहवासा-बेइमान होऊं कैसा ? ६

चाळितां धर्मग्रंथाला-स्वामीची मूर्ती दिसते !
स्मरतां खलिपांचीं वचनें-तद्वचमाला आठवते !
बघतां भाऊंचे वैरी-रक्ताला उसळी येते !
बंदुकिच्या नळिकेंतूनी
तोफेच्या तोंडांतूनी
उडती गोळे मैदानी
करिती भाऊच्या घोषा-बेइमान होऊं कैसा ? ७

जातीचे हिंदु असोत-देशाचे बंधू माझे.
अभिमान तयांनां माझा-माझ्यावर त्यांचें ओझें
कर्तव्याच्या धर्माला-जागोनी कीर्ती साजे
आज काय सांगूं वर्म
शिकवीन उद्यां तुज धर्म
स्वामीभक्तीचें कर्म
निरवावें स्वामित्रासा-बेइमान होऊं कैसा ? ८

यमुना उतरोनी दिल्ली-अडवून तुवां ती धरिली
दख्खनच्या वाटेवरची-नाकेबंदीही केली
तळव्याची चढली आग—मस्तकास जाउन भिडली !
दाराला लावुन पाय
वळवाया बघशी काय ?
कां होइन मी निरुपाय ?
सोडून दीर्घ निःश्वासा-बेइमान होऊं कैसा ? ९

होईल उद्यां उभयांचें-जैं हटा-तटाचें युद्ध
हुतुतू घालित बोलाल-दीन दीन होऊन क्रुद्ध
मी कर्तव्याच्या घोषें—हसवीन ज्ञानी वृद्ध
घोलघुमट बांधुन पुढतीं
आरावा देउन भवंतीं
एकदांच ती सरबत्ती
देईन घालुनी वळसा—बेइमान होऊं कैसा ? १०

बरवा माझा हा मजला-शोभतो शिपाई-बाणा,
मोत्यांची पगडी तूझी-तुजला परती करतांना,
एकमूठ दारू देतों-हा शूराचा नजराणा !
मुसलमान हिंदूसाठीं
घेती मृत्यूच्या गांठी
हा इतिहासाच्या पाठीं
लिहवीन लेख सुंदरसा—बेइमान होऊं कैसा ? ११

# " गारदी कटोनी मेला ! "

कुरुक्षेत्रावर निदानीचा संग्राम करावयास **मराठी फौज** सज्ज होऊन पुढें आली. **इब्राहिमखानाचे** पडघम ढोल झडूं लागले. त्याच्या पलटणी अघाडीवर चालल्या. नखशिखांत लष्करी पोषाखांत नटलेला **तो जंगबहादूर भाऊसाहेबापुढें** शेवटच्या सलामीस आला, आणि **अहमद्-शहा अबदालीकडून**-आपणास येऊन मिळण्याविषयीं-आलेलीं पत्रें दाखवून ह्मणाला, " साहेब ! मीं इस्लाम-धर्माचा आहे पण निकमहराम नाहीं हें आपल्या प्रत्ययास येईल. या युद्धांत जरी मी नामोहरम झालों तरी धन्या-करितां-" गारदी कटोनी मेला " हेच माझ्या कीर्तीचे शब्द जगाच्या कानीं जातील ! **भाऊसाहेबांचा** त्याच्यावर फार लोभ होता; तीं पत्रें पाहून ते सद्गदित झाले आणि इतकेंच ह्मणाले कीं, " खानसाहेब ! मीही तुह्मांबरोबर कत्तल होऊन जाईन पण मागें हटणार नाहीं ! आतां बोलायला वेळ नाहीं. घोडा मैदान समोर आहे. या **भाऊचा** अभिमान **खानसाहेब** कसा ठेवितात तो मी आज पाहणार आहें. " **इब्राहिमखानानें** मान लववून फिरून एकवेळां सलाम केला. घोड्यास टांच मारिली आणि एकदम तोफांना सरबत्तीच दिली ! !

* * *

जातीचा ' खान ' परंतू-जो भारतभू-सुत होता
जो तिच्याच अंकावरती-दुग्धामृत प्याला होता

यत्प्रवाह नवरुधिराचा-नसनसांत खेळत होता
जननी-ऋण फेडायाला
स्वामिभक्ति दावायाला
'भाऊसह' पानपताला
इब्राहिम संगिनवाला- गारदी कटोनी मेला १

तो कवायती फौजेचा-चौफेर बांधुनी गोल
चालला अघाडीवरतीं-वाजवीत पडघम ढोल
भाऊस सलामी देतां-शेवटचे वदला बोल
"मी धर्माचा इस्लाम!
नाहीं परि निमकहराम!
जरि झालों नामोहरम!
संपादिन या कीर्तीला-गारदी कटोनी मेला" २

"ही वेळ न बोलायाची-कर्तव्यसमय हा खान!
हा समोर आतां आहे-घोडा आणी मैदान
पाहीन ठेवितां कैसा-या भाऊचा अभिमान"
चढवुनी मिशीवर हात
बोले तो आवेशांत—
"येतील शब्द कानांत
विजयी झाला वा गेला-गारदी कटोनी मेला" ३

मांडीच्या खालीं घोडा-फुरफुरुनी नाचत होता
टांचेनें उडवित गेला-डोळ्यांनीं बघतां बघतां
तो मेघ वायुवेगाचा—वीजेनें भरला होता
'कड कड' या आवाजानें

दशदिशांस भरिलें ज्यानें
अंतींही तो जोमानें
गगनांत निघोनी गेला-गारदी कटोनी मेला ४

गिलच्यांच्या तोफावरतीं-फेंकतां नेमके गोळे
होऊन तयांच्या ठिकऱ्या-अस्मानीं तुकडे गेले
अफगाणी गोलंदाज-होते कीं नव्हते केले
तें युद्ध तोफखान्याचें
चातुर्य खानखानांचें
उलटले डाव युद्धाचे
गढला तेथुनि ना ढळला-गारदी कटोनी मेला ५

भेसूर गर्जना व्हावी-नाचावी चपला वरतीं
वृष्टि श्रावण महिन्याची-खंड ना जियेला पडती
खालती रक्तमांसाच्या-चिखलानें भरली माती
तो घटोत्कची अवतार
गारदी रिसालेदार
रक्ताची गाळित धार
गर्दीतचि गारद झाला-गारदी कटोनी मेला ६

तें दैवचि फिरलें होतें-करणार काय त्या कोणी ?
आकाश फाटलें त्याला-लावावें ठिगळ कुठोनी ?
फुटतां सागर रोधावें-खडकानें किति अडवोनी
'विश्वास' सोडुनी गेला
'भाऊ' न दिसे नयनाला
पण स्वामीच्या कार्याला
लढला तेथेंची निजला-गारदी कटोनी मेला ७

होळीच्या होळकरांची-आधींच परतली स्वारी
बिजलीवर होउनि स्वार-फिरली शिंद्यांची स्वारी
रणरंग पाहुनी घेती-एकेक पाय माघारी
समशेर-बहाद्दर पडले
तेजस्वी तारे तुटले
पेंढारी धांवत सुटले
रणसिंह न परि चळवळला—गारदी कटोनी मेला ८

शिंद्यांची दृष्टी गेली-इब्राहिमखानावरतीं
फेट्याचे पेंच सुटोनी-रुळती मानेच्या भंवतीं
अर्धीच जळाली दाढी-तोंडीं फेंसाची भरती
परि कवायती फौजेसी
दे वरचेवर हुकुमाशीं
भिडवी नेउनि गिलच्यांशीं
नखशिखांत शौर्य भरला-गारदी कटोनी मेला ९

शूराचें शौर्य बघोनी-राहवे न त्या शूराला
" शाबास ! खानसाहेब ! ". गहिंवरुनी शिंदा वदला
तो जंग-बहादुर मान-लववोनी थोडा हंसला
" पाटील चालला तुह्मी
येऊं न शके परि हा मी
कळवा नानांस सलामी
सांगा कीं:—" नाहीं हटला—गारदी कटोनी मेला " १०

तनख्याच्यासाठीं ज्यानें-अडवुन कितीदां धरिलें
हट्टही तुह्मीं लाडानें-ज्याचे सगळे पुरवीले
आपुल्या कृपेची छाया-ज्यावरी सर्वदा डोले

बेइमान नाहीं झाला
जागला खऱ्या निमकाला
घनघोर अशा समयाला
हें कळवा हो ! नानांला-गारदी कटोनी मेला ११

रडतील बायका पोरें-जा सांभाळा जा त्यांना
घ्या सलाम शेवटचा हा-मज मारूं द्या गिलच्यांना
शिंद्यांनीं मुख फिरवीलें-लावून पदर डोळ्यांना
चालली लांडगेतोड
आली बाजू बिनतोड
सर्वस्वी झाला मोड
विच्छिन्न होउनी पडला-गारदी कटोनी मेला १२

हिंदूच्या मानेवरतीं-ठेवोनी अपुली मान
देशाचा अमुचा भाई-निजला इब्राहिमखान
जातीचा पडदा आह्मी-फेकोनी देऊं मान
निजराष्ट्रहिताच्यासाठीं
व्हाव्या सकलांच्या गांठी
परवा न जिवाची मोठी
हें दावाया सकलांला-गारदी कटोनी मेला १३

---

# "विश्वास सोडुनी गेला."

**पानिपतचें** रणकंदन जोरांत येऊन जेव्हां खाशा-खाशांचे मुडदे पडूं लागले, तेव्हां **विश्वासरावांनीं** हुजुरातीची पागा घेऊन **दुराणीवर** घोडे घातले आणि एकदम घाव केला! तों एकाएकींच छातींत गोळी लागून **विश्वासराव** ठार झाले! **नानासाहेबांचें** निधान हरपलें! **भाऊसाहेबही** सरमिसळ होऊन स्वतः हत्यार चालवीत होते. "विश्वास सोडून गेला" ही वार्ता ऐकतांच त्यांचें अवसान गेलें. त्यांनीं जवळ येऊन 'बाळ विश्वास' ह्मणून त्याला उराशीं लाविलें! त्यानें "काका!–" एवढेंच ह्मणून भाऊंच्या खांद्यावर जी मान टाकिली ती पुन्हां उचललीच नाहीं!! तेव्हांचें भाऊचें दुःख किती वर्णावें?

*  *  *

रणदेवी कुरुभूमीची-शतवर्ष उपोषित होती
पातला सदाशिवभाऊ-रणकंकण बांधुनि हातीं
पेटलें कुंड युद्धाचें-कित्येक आहुती पडती!
आकाश फाटलें सारें
भाऊंना शिरलें वारें
पाडिले शवाचे भारे
तों दुःखध्वनि हा उठला–'विश्वास सोडुनी गेला!' १

तें सळसळणारें रक्त-गोठलें आंतल्या आंत
चेहरा उग्र भानूचा-झांकला दुःखमेघांत
दृढ मिठी तीक्ष्ण खड्गाची-जाहली शिथिल हातांत

शत्रूला कर्दनकाळ
पातला तेथ तत्काळ
लावुनी उराशीं बाळ
शोकानें 'भाऊ' वदला—'विश्वास सोडुनी गेला!' २

बोलुनी मुखानें 'काका'-टाकिली मान ती स्कंधीं
बोलणें राहिलें पुढचें-मृत्यूची चढली धुंदी
अंतींची इच्छा वदण्या-राहिला न थोडा संधी
"घरबुडवे स्वामिद्रोही
गेले मज सोडुनि, कांहीं
चिंता मी केली नाहीं
पण हाहि लाडका मातें—'विश्वास सोडुनी गेला!' ३

जिंकुनी दोन दिवसांत-दिलीला दासी केली
फोडुनी तक्त यवनांचें-उधळोनी शकलें दिधलीं
दक्षिणचा राजा तेथें-बसवीन प्रतिज्ञा केली
आशेचे उंच मनोरे
गगनाला जे भिडणारे
ज्यावरतीं रचिले सारे
युवराज इथें तो मातें—'विश्वास सोडुनी गेला!' ४

वसईच्या युद्धीं ज्यांनीं-घाबरा 'फिरंगी' केला
दभईला ज्यांनीं पुरता-दाभाड्याला निजवीला
भूषवी सदा उभयां ज्यां-विजयश्री घालुनि माला

ते ‘ अप्पा ’ आणि ‘ बाजी ’
बैसुनी विमानीं आजी
मर्दुमकी बघती माझी
पण काय करूं हो बाबा !-‘ विश्वास सोडुनी गेला! ’ ५


तोडून आइचें पोर-मी निष्ठुर घेउनि आलों
तो बळी इथें हा दिधला-खाटकी कसाई ठरलों
मिळविलें यश जरी आतां-निंद्य या जगीं मी झालों
वेगांत हाकिली नौका
खडकाचा बसला ठोका
मृत्यु या क्षणीं प्रत्येका
दुःखांत दुःख हें मजला—‘ विश्वास सोडुनी गेला ! ’ ६

पुसतील गोपिकावहिनी-“ विश्वास कुठें भावोजी ?
गुणसौंदर्याची ठेव-विसरलां कुठें ती माझी ?
तनमणी गळ्याचा होता-निजविला कुठें रणगाजी ? ”
दाबिल्या आंतल्या ज्वाला
तोडिला पोटचा गोळा
स्वाधीन जियेनें केला
मी सांगूं काय तियेला-‘ विश्वास सोडुनी गेला ! ’ ७

टाकुनी लेखणी ज्यानें-समशेर चढविली हाता
ती टाकुनियां संग्रामीं-येइल कां मजला जातां
दादाला काळें तोंड-दाखवूं तरी कां आतां

मारुनी थडक गिलच्याला
घेऊनी विश्वासाला
फिरविल्याहि असत्या ढाला
पण तोच कलीजा माझा-‘ विश्वास सोडुनी गेला ! ’ ८

नानांना जाउनि माझें-साष्टांग नमन सांगा हो
भट-कुळांतील भट गेला-अश्रु ना कुणाचे वाहो
श्रीछत्रपती शिवबांचें--तें तक्त सलामत राहो ”
बोलुनी अशा या बोला
तो आगीचा जणुं गोळा
आगींत उडोनी गेला
जाळिती शद्ब हृदयाला—‘ विश्वास सोडुनी गेला ! ’ ९



# "गिलचा खाशानिशीं मारीन !"

" **विश्वासराव** ठार झाले ! हें वर्तमान **भाऊसाहेबांनीं** पाहून अवसान सोडलें. बहूतसा विलाप करूं लागले. मग **भाऊंनीं** निश्चय केला कीं, या उपरी 'गिलचा खाशानिशीं मारीन' ह्मणोन लोकांस ताकीद केली, आणि झुंज केलें. हाणा ! हाणा ! असें मुखें बोलोन बरोबर **समशेरबहाद्दर** घेऊन पुढें झाले, आणि तीन वेळ हत्यार केलें ! लोकांनीं हिंमत धरून भाऊसाहेबाबरोबर पुढें सरसावून शिपाइगिरी बहूत केली...दुराणी व नजीबखान रोहिला १०।१२ हजार फौजेनिशीं भाऊवर येऊन वर्षले ! ते समयीं मारामार अशी झाली कीं, 'न भूतो न भविष्यति' एकदांच भोंवताले वेष्टून उभे राहिले. आंत खंदळाखंदळ क्षणभर बहुतच केली. त्यांत **भाऊसाहेब** यांची गत कैशी झाली न कळे. खासे कोणी दृष्टीनें पाहिले नाहींत. "

( पाणिपतची बखर. )

*   *   *

विश्वासाच्या दुःखाचे-भाऊनें डोळे पुसिले
पिळवटलेल्या हृदयाच्या-उच्छ्वासांना आवरिलें
पाहिलें पुन्हां तें प्रेत-क्रोधानें डोळे चढले
हृदयाचे ठोके पडती
सूडाची भाषा वदती
उठला ऐकुन 'भाऊ' ती
निश्चयांत वदला वाचा-'खाशानिशिं मारिन गिलचा' १

सौभाग्यतिलक पार्वतिचा-प्रळयार्थ 'सदाशिव' सजला!
बलसागर पुण्यपुरीचा-सीमा सोडोनी सरला!
पूज्य प्रभु उदयगिरीचा-मध्यान्हीं तप्त जहाला!
रणवाद्यांच्या नादांत
'हर! हर! या रणघोषांत
चमके जें खड्ग करांत
त्यावरी लेख शूराचा-'खाशानिशिं मारिन गिलचा' २

भीष्मास वधाया कैसा-श्रीकृष्ण त्वेषें गेला
निःक्षत्रिय महि करण्याला-परशुराम कैसा सजला
भाऊनें गतगोष्टींची-स्मृति दिधली कुरुभूमीला
अंगार भडकली होती
तरि तोफांपुढती छाती
शूराची नाचत होती
वाहे वायू श्वासाचा-'खाशानिशिं मारिन गिलचा ३

प्रत्येक हिराहिरीसरसा-गर्जे कीं "हाणा! हाणा!"
हुतुतूनें लढतां लढतां-खुणवी कीं "हाणा! हाणा!"
'ठेवा मर्दानों ठेवा-भगव्या झेंड्याचा बाणा'
राष्ट्रीय निशाणावरतीं
गिलचांची झाली भरती
गर्जली भाउची मूर्ती
'हा समय क्षात्रधर्माचा-खाशानिशिं मारिन गिलचा' ४

उजव्या बाजूनें शिंदा-'हर हर' गर्जोनी उठला
तीराचा सुटला बाण-कमरग्यांत जाउन भिडला

डाव्या बाजूला खान-गिरिसम होता गढलेला
पुढुनी शिंद्यांचा मार
मागुन खानाचा जोर
केला शत्रू बेजार
अभिमान स्वामिवचनाचा-' खाशानिशी मारिन गिलचा ' ५

हुजुरातीच्या फौजेनें-राखिलें नांव हुजुराचें
वंशदीप यशवंतांनीं-ऋण फेडियलें वंशाचें
दौलतिच्या आधारांनीं-लाविले कौल प्राणांचे
दमदार दमाजी दमला
समशेरबहाद्दर अडला
विठ्ठल शिवदेवहि फिरला
फिरला निर्धार न त्याचा-' खाशानिशिं मारिन गिलचा ' ६

विजयाच्या उन्मादांत-होता तो अहमदखान
फत्ते झाली ह्मणुनी तो-धुंदींतच दुंदीखान
चावली जीभ नजिबानें-उतरे तो हौद्यांतून
टिपरवाइ तरवारीची
क्षणभर केली निकराची
दिसतां स्वारी शाहाची
कळवी निश्चय भाऊचा—' खाशानिशी मारिन गिलचा ' ७

भीमानें शक्ती अपुली-भाउला दिधली होती
विजयानें आनंदानें-चपलता दिलेली होती
जो धर्म युधिष्ठिर त्यानें-धीरता अर्पिली होती
पांच नद्या वाहति जेथ

१ इब्राहिमखान गारदी. २ अर्जुनानें.

ग्रंथ संग्रहाल



अगणित हा वाहवि तेथ
भिन्नता मात्र वर्णात
भटमंत्र समरतीर्थाचा—' खाशानिशिं मारिन गिलचा ' ८

नजिबखान अहमदशाहा-अगणित सेनेनिशिं आले
" दीन दीन " करुनी त्वेषें-एका भाऊवर पडले
त्यानेंही टाकुन खड्ग-पट्टे हातीं चढवीले !
एकवटुन शक्ती सारी
रोंख धरून तो बलहारी
चढवी शाहावर स्वारी
समय सत्यसंकल्पाचा—' खाशानिशिं मारिन गिलचा ' ९

पुण्यश्री श्रीवर्धनची-राज्यश्री शिवनेरीची
विभवश्री पुण्यपुरीची-धर्मश्री सज्जनगडचीं
अभिवांछा प्रत्येकीला-भाऊच्या मांगल्याची
शोणभद्र नद तो तिकडे
शोणितनद वाहे इकडे
मांसखंड जिकडे तिकडे
शाहास धाक भाऊचा—' खाशानिशिं मारिन गिलचा ' १०

भेसूर कृष्णमेघांत-चमकोनी लपला तारा
नाहींच पुन्हा तो दिसला-निखळला कुठें कीं गेला
" भाऊ ! भाऊ ! " ह्मणुनीयां-हळहळला भारत सारा
सत्प्रतिज्ञ असती त्यांच्या
जरि सिद्ध न झाल्या वाचा
आहुती देति प्राणांच्या
अर्थ हाच या वाक्याचा-' खाशानिशिं मारिन गिलचा ' ११

# "धन्य जननि जनकोजीची."

कुरुक्षेत्रावर **भाऊसाहेबाबरोबर** निधड्या छातीनें पराक्रमाची शर्थ करून शेवटपर्यंत लढणारा मराठ्यांपैकीं वीर **जनकोजी शिंदे** होय. "हाणा! हाणा!" ह्मणतांना **भाऊंच्या** तोंडाला खरस आली; गळा कोरडा पडला! तेव्हां ते हातानें व माननें "हाणा! मारा!" ह्मणून खुणवूं लागले! त्यावेळीं या बालवीरास इतका त्वेष चढला कीं, **दुराणीचा** तोफखाना 'धूं धूं' करीत असतां तो **दुंदेखान, नजीबखान** या रोहिल्यावर आणि **अहमदखान** पठाणावर एकटाच **अभिमन्यूसारखा** तुटून पडला! धमधम्यापर्यंत घोडदळ नेऊन तोफांच्या कानांत खिळे ठोकले! त्यानें वरचे-वर पडणारे **अरबांचे** व **दुराणीचे** वेढे फोडून पुन्हां **भाऊसाहेबाजवळ** जरिपटका आणून भिडविला! तेव्हां दोघांवरही **दुराणी** व **नजीबखान** हे १०।१२ हजार फौजेनिशीं कोसळले!! तेथें देखील **जनकोजीनें** 'न भूतो न भविष्यति' असा पराक्रम गाजविला. अनेक घावांनीं घायाळ झालेला हा वीर रवंदळारवंदळी करीत मूर्छित झाला. रोहिल्यांनीं त्याला तशा स्थितींत उचलून नेला—पुढें या संग्रामसिंहाचा मृत्यू अत्यंत हृदयद्रावकरीतीनें झाला. रोहिल्यांनीं आपसांतील कलहानें त्याचे तुकडे तुकडे केले व ते जमिनींत पुरून टाकिले!!

* * *

आभाळ कोसळुनि पडलें-ज्या दिवशीं भाऊवरतीं
" ह्मणा ! ह्मणा ! " ह्मणतांना-कंठाच्या नाड्या फुगती
तोंडाला कोरड पडुनी-शद्ब ना उमटती पुढतीं
हातानें खुणवी मारा ?
मानेनें खुणवी मारा ?
शिंद्यांना भरला वारा !
सारिली भिंत फौजेची-धन्य जननि जनकोजीची ! १

बंदुका कडाबिनि यांच्या-फैरीवर फैरी झडती
तोफा जेजाला यांची-सरबत्ती होतच होती
मारुनी मुसंडी त्यांत-मोर्चावर केली गर्दी !
पाणी ओतुन तोफांत
ठोकिले खिळे कांनांत[1]
ठाके रणमैदानांत
द्याया धडकी जोराची-धन्य जननि जनकोजीची ! २

चरणारे भीमथडीचे-ते तुरग पंचकल्याणी
कांहीं प्यालेले होते-त्या मुळामुठांचें पाणी
इकडे तर भव्य रिसाला-काबुल खोकंद दुराणी
ते पठाण खैबरघाटी
करिती बहु आटाआटी
दावुनि चपळाई मोठी
भिजवी टोकें भाल्यांचीं-धन्य जननि जनकोजीची ३

१ टीपः—तोफांच्या कानांत.

वीरांच्या पायांखालीं-घोड्यांच्या टापांखालीं
धरणीगत घायाळांची-उठीली भेदक किंकाळी
त्या निर्वाणीच्या कालीं—कोणी न कुणाचा वाली
दिसतील तयां कापावें
येतील तयां झोडावें
यावीण दुजें ना ठावें
तृप्ति करी चामुंडेची—धन्य जननि जनकोजीची ४

वय पुसाल कितिसें होतें—विश्वास तरी तो मोठा
जयवंत ‘ जयाप्पा ’ त्याचा— बापसे सवाई बेटा ’ !
पेटोनी क्रोधाग्नीनें—वैऱ्यांचा शिजवी घाटा !
कुमक ना कुणाची पाही
कोणी येइल कीं नाहीं
हिमतीनें चालुन जाई
गाळण उडवी गिलच्यांची-धन्य जननि जनकोजीची ५

अश्वत्थामा द्रोणाचा-कीं अभिमन्यू पार्थाचा
कर्णवीर सूर्याचा वा-कार्तिकेय रुद्रेशाचा
मारुती मारुताचा कीं-इंद्रजीत लंकेशाचा
तैसा शूराचा शूर
वैऱ्यांचें दडपित ऊर
हांकून लावि तो दूर
सेवा करि निज-राष्ट्राची—धन्य जननि जनकोजीची ६

चढुनी अरबांना जोर-गेले खवळोनि पठाण
धारेखालीं कितिकांना-घडलें कंठाचें स्नान

कापितात कणसें तैशीं-कापिलीं शिरें बेभान
देहांच्या लाह्या फुटल्या
पगडिच्या कंगण्या सुटल्या
घोड्यांच्या दुमच्या तुटल्या
हिंमत चढली फौजेची—धन्य जननि जनकोजीची ७

" माझ्या अन्नाचे जे जे-असतील जिवाचे प्यारे
या माझ्या जखमा बघुनी-ज्यांना येतील शहारे
असतिल जरि सेवायाचीं-उघडीं स्वर्गाचीं द्वारें
ते लढोत मजसह धन्य
जावोत पळोनी अन्य "
वच वदुनि असें सन्मान्य
गर्जना करी हल्ल्याची !-धन्य जननि जनकोजीची ! ८

नेकजात कडवे वीर-भरधाव चालुनी गेले
दाटी झाली चहुंकडुनी-खाशाला खासे भिडले
भगव्या झेंड्याच्या खालीं-योद्धे ढालाइत पडले
बेसुमार कत्तल झाली
भूमी रुधिरानें न्हाली
शिंद्यांची मूर्ति निघाली
काठी घेउन झेंड्याची-धन्य जननि जनकोजीची ९

दाढीके रखनेवाले-काबुल कंदाहरवाले
खांडेसे लढनेवाले-जंगसे न हटनेवाले
सूं सूं सणणण् बाणोंकी-बरसात बरसनेवाले

ऐशांचा पडला वेढा
झुंजार वीर तो गाढा
संतोषवि अमित गिधाडां
भागवी तृषा कालीची-धन्य जननि जनकोजीची १०

किल्ल्याच्या दरवाजाला-मारावी थडक गजानें
पारधी चिरुन टाकावे-जो मत्त वराह तयानें
वृक्षांच्या संमर्दांना-टक्कर द्यावी गेंड्यानें
सरकुनी जरासा मागें
तोंडानें बोलुनि ' घे ! घे !
उधळोनी जाई वेगें
कोंडी फोडी वेढ्याची-धन्य जननि जनकोजीची ! ११

बंधारा दगड विटांचा-फोडावा जलओघानें
विदळाला तट दुर्भेद्य-कीं तोफेच्या गोळ्यानें
भेदावी शैलश्रेणी-देवेंद्र-तीक्ष्ण-वज्रानें
तैसा आवेशें भरुनी
सेनेचे तट पाडोनी
चापल्यें गेला निघुनी
मति गुंग होय शत्रूंची-धन्य जननि जनकोजीची ! १२

दोन्हीही हातीं पट्टे-चढवोनी ' भाऊ ' घुसला
आदित्य प्रळयकाळाचा-दैदीप्यमान तो गमला
कापित उडवित खांडोळी-गेला तो पुरता गेला
दरकेना छाती ज्याची
फिरवी न दिशा पायांची

चमके ठिणगी तेजाची
ऐशा त्या नररत्नाची-धन्य जननि जनकोजीची १३

धूळीचे लोट उठोनी-दिवसाची रजनी झाली !
घनघोर गर्जना चाले-तोफांची चमके बिजली
सर सर रुधिराच्या धारा-वर्षोनी भूमी भिजली
मुंग्यांचें वारुळ फुटलें
तें थांबायाचें कुठलें
उठले ते धावत सुटले
तनु निश्चल धैर्यगिरीची-धन्य जननि जनकोजीची ! १४

पाठीवर अरब पठाण-पेंढारी पुढतीं पळती
दाढी शेंडीची गांठ-तोडुन तुटणारी नव्हती
पुण्याइच ज्या साध्वींची-तत्पति कहरांतुन सुटती
" पाणी ! पाणी ! " मागून
कोरड कंठाला पडुन
कितिकांचे सुटले प्राण
बाजू न सोडि शर्तीची-धन्य जननि जनकोजीची १५

राष्ट्राचा शामीयाना-चौफेर तणावे तुटले
धीराचा एकच खांब-वायूसह झगडुनि डोले
हां ! पडेल, किंवा पडला-बसती मोठाले झोले !
एका खड्गाग्रावरतीं
दख्खनची अब्रू होती
तें खड्ग जयाच्या हातीं
त्या शिंदे-कुलदीपाची-धन्य जननि जनकोजीची ! १६

बद्रिनाथ नारायण जो-लाविले तयानें डोळे
काशी विश्वेश्वर शंभू-तोही न जागचा हाले
वनदेवि अष्ट दिक्पाल-नाहीं कोणीही द्रवले
सांगा नशिबाला काय
करितां येईल उपाय ?
वदतां न मुखानें हाय !
पूर्ति करी कर्तव्याची-धन्य जननि जनकोजीची १७

वीत वीत जागेवरतीं-जखमा झाल्या देहाला
जीवाचा होता कोण-तैं पट्या बांधायाला
होवोनी शक्तीपात-झांपड पडली डोळ्यांना
खानानें धरितां हात
मारी झटका जोरांत
नरडीला देउन हात
शय्या केली धरणीची-धन्य जननि जनकोजीची १८

मृत्यूच्या दरबाराचा-शेवटाचा साक्षीदार
मातृ भूमिसाठीं सोडी-नैराश्याचा हुंकार
डोळ्यांतुनि खळ खळ वाहे-ती उष्णाश्रूंची धार
दिनमणि पाठीला झुकला
संमुख परक्यांना झाला
शेवटचा धीरा पडला
सोडी न मूठ खड्गाची-धन्य जननि जनकोजीची ! १९

तो ग्वालेरीचा वाघ-ग्लानीनें मूर्छित झाला
रोहिले शिकारी आले-गोटांत उचलुनी नेला

नीचांनीं गृहकलहानें-तो पंचीप्यारा चिरिला
हर ! हर ! केले हो तुकडे !
हृदयाचे होती तुकडे
पण वदते ऐका तिकडे
रणदेवी पानपताची-'धन्य जननि जनकोजीची !' २०

फत्तर हिमशैलेंद्राचे-कारुण्यानें पाझरले
दुःखानें धवलगिरीचें-मुख धूसर होउन गेलें
गौरीशंकर-नयनाचे-हिमबाष्पराशि वरघळले
पावन पुरुषाचां आइ
जान्हवी प्रपातें गाई
जीं स्मृतिचित्रें उत्साही
त्यांतुनी नाद ये हाची-"धन्य जननि जनकोजीची" २१

# "भाऊ! भाऊ!"

" **नानासाहेब!** आह्मांसारखे तुह्मास पुत्र आहेत व आणखीही होतील. परंतु **भाऊसारखा** बंधु मिळणार नाहीं." असें **विश्वासरावांनीं** पानिपताहून-भाऊसाहेबांस कळूं न देतां-पुण्यास पत्र लिहिलें होतें त्याप्रमाणें नानासाहेब स्वतः ५० हजार फौज घेऊन त्यांच्या मदतीस निघाले. पण अर्ध्या वाटेंतच त्यांस **भाऊसाहेब** व **विश्वासराव** पडून मराठ्यांचा विध्वंस झाल्याचें वर्तमान कळलें. त्यावेळीं भाऊच्या दुःखाचा त्यांस एवढा धक्का बसला कीं शेवटीं त्यांनीं पर्वतीवर " भाऊ! भाऊ! " ह्मणून प्राण सोडिला!!

* * *

बोलतां काय हे शब्द-'भाऊ मज सोडुनि गेला!'
ही वार्ता कसली कर्णीं-ओतिलें तप्त तैलाला!
तळमळती पंचप्राण-देहाचा भडका झाला!
शत्रुला न साहे मारा
ज्यापुढें न धरवे थारा
पळती ते सैरावैरा
ऐसा तुटला मम बाहू-भाऊ तुज कोठें पाहूं १

करवीरीं रुसुनी जातां-धावलों तुझ्यामागून
प्रेमाची घालुनि आण-आणिलें तुला परतून
इच्छा पुरवाया सजलों-हें राजपदहि सोडून

अत्यंत दिव्य ती प्रीति
तुजवरतीं माझी होती
रुसलास पुन्हां मजवरतीं
आतां पण कोठें जाऊं- भाऊ तुज कोठें पाहूं २

गेला होता विश्वास-तूं येतासी परतून
तें विष मी गिळिलें असतें-माधवाकडे पाहून
ती जखम पुत्रदुःखाची-भरली असती मागून
घावावरि बसला घाव
हृदयाचा घेई ठाव
आतां न सुखाचें नांव
'भाऊ' कोणाला बाहूं-भाऊ तुज कोठें पाहूं ३

अवतार परशुरामाचा-अद्वितीय ब्राह्मणवीर
कर्णासम संकटकाळीं-जो स्वावलंबनीं धीर
जो युधिष्ठिराचि भासावा- घनघोर संगरीं स्थीर
ऐसा तूं भाऊराया !
दैवाची वळतां छाया
त्वत्सद्गुण गेले वाया
विरहातें कैसा साहूं-भाऊ तुज कोठें पाहूं ४

कां इतुका देहावरतीं-तूं उदार झाला होता ?
कां पुण्यपुरीला तूंतें-मायेचा कोणी नव्हता ?
प्रीतिचा उन्हाळा राया-तुजला कां झाला होता ?
मम छत्र तुझ्यावरि होतें
तुज कमी काय जगीं होतें

मज कळवायाचें होतें
नसताच दिला मी जाऊं-भाऊ तुज कोठें पाहूं ५
जरिपटकेवाले योद्धे- अटकेला जाउनि भिडले!
फटके बसतां शत्रूचे-पटकेहि गमाउनि आले!
फुटकें हें दैवचि माझें-चटके हृदयाला बसले
उधडिला सिंह कोल्ह्यांनीं
काढिला पाय व्याघ्रांनीं
घेतला धाक शेळ्यांनीं
कुठवर शोकाला गाऊं?-भाऊ तुज कोठें पाहूं ६
उचलुनी तळी शत्रूची-'एळकोट' करुनी धावा
ऐसा जबरा लढवय्या-कां हात हालवित यावा
मग बरा ह्मणावा 'खान'-प्राणानें केली सेवा
पाहिजे तिथें जातीचें
ना काम मेंढपाळाचें
खाउनी अन्न स्वामीचें
आले हे नांवगमाऊ-भाऊ तुज कोठें पाहूं ७
घोरांत शत्रु पाडावा-ते स्वतांच घोरत पडले!
मारावा मर्मी डंख-ते डंखी होउन आले!
चारावी रिपुला धूळ-ते धुळींत लोळत पडले!
ग्रासितां राहु चंद्राला
मुकती तारे तेजाला
सुटका त्याची करण्याला
कां प्राण दान हें देऊं-भाऊ तुज कोठें पाहूं ८

जातीचे पुरुष असोनी-बायका होउनी आले!
ज्या खऱ्या बायका त्यांच्या-अन्नूवर पडले घाले!
आईबापाविण मुलगे-कित्येक पोरके झाले!
आप्तांच्या भेटी कुठल्या?
प्रीतीच्या माळा तुटल्या
दोन लाख विधवा रडल्या
कां प्राशोनी विष घेऊं-भाऊ तुज कोठें पाहूं ९

आगींत उडी घेतांना-त्या तुमुल युद्धसमयातें
पळपुटे अशांच्या हातें-त्वां निरोप दिधला मातें
'स्वर्गांत पोंचलों आह्मी-पावावें ना दुःखातें!'
मी वडील असतां मातें
सोडोनी जगतीं येथें
तुज उचिताचि जाणें नव्हतें
कां स्वर्गीं उडुनी येऊं-भाऊ तुज कोठें पाहूं १०

अप्पांच्या जवळी बंधो! स्वर्गीं गेला असशील
बाजीही विश्वासाला-घेउन बसले असतील
तुज पाहतांच दोघांनीं-मज दोष दिले असतील
संसार न झाला ज्याचा
बळि दिला अशा भावाचा
उरला वंश न काकांचा
हें शल्य कसें तरि साहूं-भाऊ तुज कोठें पाहूं ११

तूं दरबारीं दिसशील-ह्मणुनी मी तेथें जातां
दरबार ढाळितो अश्रू-मी "भाऊ! भाऊ!" वदतां

परतुनी शयनमंदीरीं-डोकावुनि तुजला बघतां
स्वकरीं ठेऊन कपोला
अश्रूंच्या वाही माला
त्या तुझ्या धर्मपत्नीला
कोणत्या वचें समजाऊं-भाऊ तुज कोठें पाहूं १२

जे सुभेदार सरदार-विसरले तुला साचार
अंगचोर विधिच्या नांवें-फोडिती खडे ते फार
मीही विसरावें तुजला-सांगतात गोष्टी चार
जे मोठे मोठे राव
दावितात स्वामीभाव
त्यांनींच बुडविलें नांव
हे सारे भोजनभाऊ-भाऊ तुज कोठें पाहूं १३

दुःखद हृदयाचे पीळ-उकलून कुणा दावावे
जें कसेंसेंच मज होतें-तें कसें मुखीं बोलावें
बंधूप्रीतीचें वेड-वेड्यांना कसलें ठावें !
सौमित्रासाठीं हाय !
श्रीराम रडे असहाय
माकडांस त्याचें काय
बोलून कशाला दावूं-भाऊ तुज कोठें पाहूं १४

तंव वसतिक्रीडास्थानें-दुःखातें करिती जागें
हा शनिवाराचा वाडा-खायास धांवतो मागें
ही धुरा राजशकटाची-ओढाया मन ना लागे

एकान्तस्थल पाहून
पर्वतीवरी येऊन
बसलों तरि विरहक्षीण
जाईना क्लेशद आयु—भाऊ तुज कोठें पाहूं १५

उपवासी भाऊ गेला-गिळवे न अन्न हें उचला
तो निजला भूमीवरतीं-भूमीवरती मज घाला
तो गेला वाऱ्यावरतीं—वाऱ्यावर मजही घाला
उघडा तेजाचा लाल
गेला घेवोनी काळ
मज हवी कशाला शाल !
पडला काळाचा बाहू-भाऊ तुज कोठें पाहूं १६

बसलां कां शयनाभंवतीं ?-खालीं घालोनी माना
आणिले कशाला वैद्य ?-जाउन भाऊला आणा !
आला का माझा ' भाऊ ' ?—अंधारी आली नयना !
एक वेळ भाऊ बोल !
बोल हा चालला खोल !
करूं नको मदाशा फोल !
ये आलिंगन बा ! देऊं-भाऊ तुज कोठें पाहूं १७

" भाऊ भाऊ ! " करितांना-गेला देहांतुनि श्वास
जीवास लागला ध्यास-पण पुरली नाहीं आस
दुःखावर बसला डाग—हळहळला सारा देश
इतिहास महाराष्ट्राचा
उज्वल बंधुप्रीतीचा
अजुनीहि पर्वतीवरचा
वाहे या शद्वें वायू—भाऊ तुज कोठें पाहूं १८

# "महांकाळी"

## (तोफ)

(चाल:-चंद्रकांत राजाची कन्या०-)

हिंदविजयलक्ष्मीची भगिनी तोफ महांकाळी
त्वांच चढविली राज्यलक्ष्मिच्या सौभाग्यीं लाली
तुझ्या जिवावर विंध्याद्रीच्या फोडुनी कोटाला
तीक्ष्ण मराठी भाला नाचत गेला दिलीला
भीथडीची टाप उसळली तुझ्या दमावरतीं
हालविली सल्तनत उधळिली तख्तावर माती
जरिपटक्याचें पुच्छ उभारुनि सह्याद्री-कुहरीं
करित गर्जना केली कितिदां शर्थ महासमरीं
रिपुसेनेचे प्रचंड जलधर गर्जत असतांना—
लाल लाल रक्ताचा पाउस वर्षत असतांना—
—तुझी गर्जना, तुझी धडाडी, तुझीच मर्दुमकी
पडती बाजू सांवरण्याला सहाय झाली कीं
पंचरसाच्या समरसाच्या तोफांचा ताफा
ठिकऱ्या केल्या नभीं उडविल्या रिपु टाकी धापा
धैर्य गळालें धैर्यासह करकृपाणही गळले
गोळे सुटले तोंच त्यांसवें प्राणहि ते सुटले
निनादिनी तव निनाद जों नच ऐकाया आले
नवजयनिश्चय नवोत्साह तों पर हृदयीं भरले

हां हां ह्मणतां धूर पसरिला नभास व्यापियलें
दिनमणिच्या साम्राज्यांतूनी तारे नाचविले
सूर्यज्योती चंद्रज्योती यांची बरसात
न पाहिलेली दाखविली तूं तुर्की समरांत
गोळ्यांचा सोपान रचियला भूस्वर्गामाजीं
रणतीर्थी जे पावन झाले ते चढले गाझी
बार ठासला, गोळा चढला, ठिणगी जों शिवली
मृत्युलोकची तोंच मंडळी स्वर्गावर चढली
होळकरांची उजवी बाजू डावीला शिंदा
तुझ्या दमावर भिडवित गेले खांद्याला खांदा
निधडे निधडे निदानसमयीं निकराला आले
धडड्ड्-धडड्ड् तुझ्या निनादें धडाडिनें लढले
अष्टदिशांच्या पडद्यामागें दडलेले वैरी
त्यांवरही अनिरुद्ध झाडिल्या फेरीवर फेरी
रक्तपिपासा मुंडावलिची इच्छा जी त्याली
त्या कालीची एकाकालीं तृप्ति तुवां केली
भैरव भूत प्रेतानंदी वेतालादिक जे
समूह त्यांचा त्वत्कंठाच्या नादें धाउन ये
शिर गेलें शिरिं हिमालयाच्या कर सिंधूतीरीं
धड न राहिलें धड जयसंगरिं जीव सुरद्वारीं
स्वराज्य आणि स्वतंत्रतेची त्रिभुवन मातोश्री
त्वद्भक्तीनें भोगुन गेले स्वतंत्रराज्यश्री
भिवरावाचा प्रणाम माते फडक्यांचं नमन
सलाम इब्राहिमखानाचा तुजही ते मान्य

❊ ❊ ❊

कुठें विजयिनी विजन काननीं वसशी एकांतीं
कुरुभूमीच्या अंत्यश्रमाची कीं ही विश्रांती?
सर्वसाक्षि होतीस भयंकर नाशाच्या कालीं
सांग ऐकुं दे कसा उमटला दैवलेख भाळीं?
काबुलच्या खड्गावर झाली अखेरची फेंक
तो दख्खनच्या शौर्यश्रीचा अखेरचा झाक
श्रीवर्धनच्या धैर्यमेरुचा विलास शेवटचा
तेजःपुंज कसा मणि तुटला तो पुण्यश्रीचा?
वसईच्या निश्चयवंताचा गर्भ निश्चयाचा
बुडी मारण्यापूर्वीं वदला सांग काय वाचा?
निजस्वामिच्या निर्वाणीच्या आज्ञा पाळाया
ग्वालेरीनें केंवि मानिली तृणापरी काया?
जरिपटक्याच्या भंवतालीचे वेढे फोडोनी
पुनःपुन्हां आणून दाविला भाऊला कोणी?
कुणीं कुणीं आईचें केलें दुग्ध तिथें सार्थ?
कालमुखीं घातल्या सुखानें माना देशार्थ?
कडानिकडीला निर्वाणीला अंतिमसमयाला
झाडित तोडा केंवि गारदी गढून तो गेला?
" अब क्या हटना? अब है मरना? सलाम साहेबजी "
संगीनींच्या फेंकी खेळत निजला रणगाजी
मेलें सारें शौर्य मरूंदे, मरणाच्यापूर्वी
कसें चमकलें, तेंच ऐकुंदे, हृदयाला सुखवी
समशेरीसम नित्य कटीशीं कटि भिडउन लढला
रक्ताचा समशेरबहाद्दर कसा कुठें पडला?

पहिल्या जोमासवेंच गेला धुरांत तोफांच्या
अंबारींतुन " धन्य दमाजी ! " उठली ही वाचा
कडाडुनी रिपुसेनेवरती गायकवाडाचा—
शर्थ करोनी गर्द जाहला वीर विक्रमाचा

* * *

स्वातंत्र्याची चौंबाजूला एकमुखी आग
लागोनी झटतील सर्वही आर्य महाभाग
त्यांतुन होइल शिवसंभव जैं अवतारी भक्त
गर्जाया लावील तुला आजि उपासनायुक्त
ज्वलत्पर्वतीं आग धुमसते उठेल डोंबाळा
" दीर्घतपाचें पुण्य उजाळितें भविष्यकाळाला "

---

# " वडगांवावरचा वीर "

( महादजी शिंदे )

पेशवाई मिळविण्याकरितां शेवटीं **राघोबादादा**-सारख्या भारतीय महावीरानें मुंबईकर **इंग्रजांचा** आश्रय केला! राघोबास बरोबर घेऊन ' जनरल **स्टूअर्ट** ' व ' **कर्नल के** , हे दोन रणझुंजार आणि हिय्येबाज इंग्रज सेनापति पुण्याच्या रोखानें निघाले. दोहोंत **स्टूअर्ट** फाकडा हा फारच पटाईत होता. त्यानें तीनच दिवसांत खंडाळ्याच्या टेकडीवर आपलें निशाण लाविलें. **कर्नल के** हा पनवेलीच्या मार्गानें तोफखाना घेऊन मोठाल्या मजला मारून **स्टूअर्ट** यास येऊन मिळाला!

पुणें दरबारास ही वेळ मोठ्या आणिबाणीची होती. इंग्रजांचा पक्ष विजयी झाल्यास **पेशवाई** त्यांच्या पंजांत सांपडणारी होती, अशावेळीं पुणें दरबाराचे सेनापति देखील किती दक्ष व रणोत्सुक असले पाहिजेत हें कांहीं सांगायला नको. **हरिपंत फडके, बर्वे, होळकर** वगैरे नामांकित सरदारांनीं तळेगांवापासून बोरघाटापर्यंत माऱ्याच्या सर्व जागा रोखून ठेविल्या होत्या. भिवराव **पानशांचा** विजयी तोफखाना बीनीवर होता. आणि सर्व सैन्यांचें अधिपत्य ज्या वीरभूषणाकडे देण्यांत आलें होतें त्या **महादजी शिंद्यांनीं** तर प्रतिपक्षास पराजित करण्याची प्रतिज्ञाच केली होती!

युद्धास तोंड लागून **पानशांच्या** तोफखान्याचा वर्षाव, **फडक्यांनीं** इंग्रजी पलटणीस मारिलेली धडकी

आणि **बरच्यांच्या** पराक्रमाची शर्थ यांनीं **इंग्रजांची** दाणादाण उडत असतां **स्टूअर्ट** यासही इतका रणावेश चढला कीं, त्यानें जिवाची तमा न धरितां मर्दीत घुसून बेलाशक हैदोसच केला! त्याच्या शौर्यानें आनंदित झालेल्या मराठ्यांनीं 'फाकडा' या पदवीनें त्याचा गौरव केला! **शिंदे** तर लालीलाल होऊन बेफाम लढत होते. या लढाईत **स्टूअर्ट** व **कर्नल के** हे दोन्ही सेनापति गारद झाले. मराठ्यांच्या चतुर सेनापतीनें वळसे घालून शह लावून इंग्रजी फौज वडगांवावर कोंडली आणि तिला शरण यावयास भाग पाडिलें!

* * *

'राघोबा' अंतीं झाला-केवळ कलहाची ज्वाला
मुंबइहुन घेउन त्याला-स्टूअर्ट फाकडा आला
बोरघाट घालुनि मागें-खंडाळ्यावरतीं चढला
'कां अमुच्या गृहकलहांत
हा रिपु घालितसे हात?'
चावून खालचा ओठ
ये महादजी रणधीर-वडगांवावरचा वीर १

"खंडाळ्यावर खांडोळी-शत्रूची उडवायाची!
शिंद्यांच्या कुलकीर्तीची-अजि नौबत झडवायाची!
विजयलक्ष्मि बाहूवरतीं-बसवोनी आणायाची"
घेउनी प्रतिज्ञा शिंदा
युद्धीं लढवय्या खंदा
देशाचा चाकर बंदा
उपसून निघे समशेर-वडगांवावरचा वीर २

तळ दिला तळेगांवाला-रोंखिलें बोरघाटाला
निवडोनी एकेकाला-साबित जंग सरदाराला
माऱ्याच्या जागीं ठेवी-कोंडाया रिपु-सिंहाला
बीनीच्या सरदारांचा
भिवराव पानसे यांचा
ताफा चमके तोफांचा
ठाकला तिथें झुंजार-वडगांवावरचा वीर ३

श्रीमंत पेशवे त्यांच्या-गादीच्या पुण्याईची—
बुद्धीचे सागर नाना-त्यांच्या समयज्ञपणाची—
जे समरधुरंधर शिंदे-त्यांच्या भुजसामर्थ्याची—
ती खरी परिक्षा वेळ
शूरांचा जमला मेळ
झाला एकच कल्लोळ
चमके बिजलीची कोर—वडगांवावरचा वीर ४

होत्या सातच त्या तोफा-चतुर मात्र गोलंदाज
एकेका गोळ्यासरसी-जिरवी शत्रूचा माज
संग्रामीं जयमरणाची-रिपुनींहि लाविली पैज
उडवीत घोड्याची नाल
वाढवीत पुढची चाल
कापीत शत्रुचा नाळ
घेरा घाली चौफेर—वडगांवावरचा वीर ५

निर्झरवारी-धर अचल-कीं मदधारा-धर दंती
किंवा जैसा शोभावा-उत्फुल्ल पलाश वसंतीं
कीं पयोद वर्षाकारी-कीं जास्वंदीची पंक्ती

ऐसा रुधिरें भिजलेला
घेउन भगव्या झेंड्याला
हैदोस कराया सजला
सोडीना जय-निर्धार—वडगांवावरचा वीर ६

दंगल करण्याला आला-संगीन खोउनी वैरी
आगीचा होउन मारा-फैरीवर झडल्या फैरी
रक्तानें ओलीं झालीं-भाल्यांचीं टोकें सारीं
हुकुमासरसी वेगानें
वडगांवाच्या रोंखानें
वळवी रिपु जें निजसैन्यें
देई गैबीचा मार—वडगांवावरचा वीर ७

कितिकांचे तुटले हात-कितिकांचे तुटले पाय
किति शिरें तनूविण पडलीं-किति शिरोविहीनहि काय
किति याचिति जल घायाळा-पडल्या जागीं निरुपाय
शूराला लागे चुरस
तोंडाला आली खरस
उत्तेजित करि सैन्यास
घेईना परि माघार-वडगांवावरचा वीर ८

जयवंत ' जयाप्पा ' शिंदे-नागोरावरचा वीर
यमुनेच्या घाटावरचा-' दत्ताजी ' शिंदे शूर
योद्धा कुरुभूमीवरचा-' जनकोजी ' संगरधीर
त्या दिवशीं आकाशांत
सुरवर यांच्या समवेत
डोलत होते मोदांत
वंशज विजयी ठरणार-वडगांवावरचा वीर ९

आकाशांतोनी पडती-त्यावर पुष्पांच्यामाला
कडनिकडीच्या समयाला-चपल हस्त गुंते त्यांला
जणुं दे लतिकांजवळी तो-त्या माला ठेवायाला
अमर-लोक आकाशांत
शार्दूल गुहाद्वारांत
विस्मित होते पाहात
नरसिंहाचा अवतार-वडगांवावरचा वीर १०

फडक्यांनीं धडकी सरसी-फोडिली फळी शत्रूची
बरच्यांनीं बरवी धरिली-दोन्ही बाजूंनीं कैची
पानसे सारखा वर्षे-बरसात तोफखान्याची
'स्टूअर्ट' जाहला ठार
'कर्नल के' निजला वीर
सुटला सेनेचा धीर
तैं करी गर्जना थोर-वडगांवावरचा वीर ११

पांढरा बावटा बोले-"थांबवा कत्तलबाजीला"!
उचलोनी टोपी हातें-करि सलाम टोपीवाला!
खड्गें घेई नमनाला-ग्वालेरी पगडीवाला!!
इतिहास स्वकरीं घेतां
वडगांवाला पाहातां
हा रिपुमित्रांच्या चित्ता
देतो स्मृति वारंवार-वडगांवावरचा वीर

# "एक काळ ऐसा होता."

(१) जुना भारतकाळ.(२) श्री छत्रपतींच्या वेळचा मराठी काळ. (३) पेशवाईचा काळ. (४) पेशवाई बुडाल्यापासून तों श्री. विष्णुशास्त्र्यांपर्यंतचा काळ असे हे काळाचे निरनिराळे ४ भाग आहेत.

*　　　*　　　*

## भाग पहिला.

जग निद्रित होतें जेव्हां- वेदांत घोष करणारे
जग अज्ञानावस्थ्येंत-शास्त्रें तेव्हां रचणारे
जग उघडें होतें जेव्हां-तैं उन्नातिला भिडणारे
　　ज्ञानवंत जन मतिमंत
　　धन विद्येनें श्रीमंत
　　होते येथेंच अनंत
रोमांच येति आठवतां-एक काळ ऐसा होता १

एक वेळ गेले शद्ब-काय ते पुन्हां फिरवावे
येवो प्राणांतिक काळ-सत्य ते करुन दावावे
भीतीचें नांव कशाला-स्वत्वातें प्रगट करावें
　　सत्वाचा उज्वल दीप
　　सत्याचें निर्मळ रूप
　　आर्यांची कीर्ति अमूप
येई ज्याकाळीं बघतां—एक काळ ऐसा होता २

पाहिजे शूर कां तुह्मां?-वाचा अर्जुन चरिताला!
कां हवा तापसी सांगा?-पाहा विश्वामित्राला?

निग्रही पाहिजे कां हो?-अवलोका जा भीष्माला
एकेक अलौकिक मूर्ति
करि कर्तव्याची पूर्ति
मिळवी शाश्वत जी कीर्ति
त्या नर रत्नांचा दाता-एक काळ ऐसा होता ३

पाठीस घातला ज्याला-रक्षक होतील तयाचे
कुणि आश्रित होउन आला-तर तरुवर हे छायेचे
कुणि चातक होउन आला-तर पयोद हे मायेचे
चंदन घासून तनूचें
परक्यांना सुखवायाचें
श्रेष्ठत्व भारतीयांचें
जन वर्णिति येतां जातां-एक काळ ऐसा होता ४

पर धर्माचे ना द्वेष्टे-निज धर्माचे अभिमानी
ना गुलाम करितिल कोणां,-राखतील अपुलें पाणी
अपहार न ठावा ज्यांना-व्यवहार नीतिचे ज्ञानी
भाववंत श्रद्धावंत
स्वातंत्र्याचेही भक्त
ऐहिक विभवास विरक्त
प्रसवी जो आर्यश्रेष्ठां-एक काळ ऐसा होता ५

" सोन्याचा कोठें धूर?-तर भारत खंडामध्यें !
कोठें रत्नांच्या खाणी?-तर हिंदुस्थानामध्यें !
अमृताची वृष्टी कोठें?-तर आर्यावर्तामध्यें " !
हें यश परक्यांनीं गावें
मन अगदीं मोहुन जावें
तारूवर भटकत यावें
पाहायातें सुंदरता--एक काळ ऐसा होता ६

# " एक काळ ऐसा होता. "

## भाग दुसरा.

बिनतारांचे संदेश-सोडावे रायगडानें
त्यावरुनी इतर गडांनीं झुंजावें अति जोमानें
गोळ्यांच्या पर्जन्यानें-भिजवावीं रणमैदानें
शौर्याचा पाहुनि थाट
तोंडांत घालुनी बोट
फिरवावी रिपुनें पाठ
व्हावी भुइ थोडी पळतां-एक काळ ऐसा होता १

गिरि-कुहरांतुनि उफळोनी-वनराज केसरी यावा
कीं ज्वालामुखि भडकोनी-आगीचा लोळ उठावा
कडकडुनी जलधरमाला-वीजेचा गोल तुटावा
शिवबाची स्वारी उठली
भ्रुकुटी कोणावर चढली ?
घटिका कोणाची भरली ?
ऐशी चाले जन-वार्ता—एक काळ ऐसा होता २

भूपाल महाराष्ट्राचा-दरबारीं जेव्हां यावा
" श्री छत्रपती शिवराज "-जयघोष असा उसळावा
सरदार शिलेदारांचा—संघात उभा ठाकावा
गोव्याचा टोपीवाला
दिल्लीचा दाढीवाला
मान्य जो तयांसहि झाला
लववितात अपुल्या माथां—एक काळ ऐसा होता ३

जे औरंगाबादेचा-बेरंग करोनी फिरती
दाभोळावर वेगानें-टोळासम जाउन पडती
सुरतेच्या सुरतीवरती-जे हात फिरउनी येती
गो-विप्रांचे ते वाली
विजयाचा तिलक कपाळीं
लावोनी ज्या त्यां वेळीं
झटले निजदेशा करितां-एक काळ ऐसा होता ४

वेढिला पुरंदर किल्ला-गाजी दिलिरखानानें
कोंडाणा कोंडुन धरिला ' जयसिंह ' समर धीरानें
किल्ल्याचे तट लढताती-मोठ्या आणीबाणीनें
जरि शिरें तुटोनी पडतीं
शिवरायाची आज्ञा ती
तरि कबंध पाळित असती
स्पृहणीय राजभक्तीचा- एक काळ ऐसा होता ५

जन्मभूमि साठीं सांगा-जातिल मृत्यूच्या द्वारीं
कुलकीर्ती साठीं सांगा-काळाचे होतिल वैरी
देशबंधुसाठीं सांगा-शेषावर करितिल स्वारी
समशेरी नाचविणारे
भाल्याला खेळविणारे
चापाला भूषविणारे
या शूरांचा जो दाता-एक काळ ऐसा होता ६

जमवून मांड घोड्याला-भरधाव कसा फेंकावा
जातां जातां खड्गानें-रिपु-कंठ कसा छेदावा
नाचवीत भाला हातीं-कैसा शत्रू वेधावा

हें शिक्षण नव तरुणांचें
'देशभक्त' या पदवीचें
ना बी. ए. एल्‌एल्‌ बीचें
उपयोग काय पण आतां-एक काळ ऐसा होता ७

शिवरायासाठीं अपुलें-सौभाग्यहि मळवायाला
एकुलता एकच पुत्र-तोही पण गमवायाला
तत्पर व्हाव्यात सुखानें—धन्य ! धन्य ! साध्वी विदुला
अपुलें फुटलेंहि कपाळ
राहो सुखि शिव भूपाल
येवो देशास सुकाल
इच्छा विदुलांच्या चित्ता—एक काळ ऐसा होता ८

जैं महाराष्ट्र भूमीची-होती भाग्याची सृष्टि
कोणाची जननी व्याली-टाकील वांकडी दृष्टि
कोणाची छाती होती—बोलेल वांकड्या गोष्टी
रावा पासोनी रंका
नव्हती कोणाला शंका
शिवबाचा एकच डंका
चहुंदिशेस वाजत होता-एक काळ ऐसा होता ९

घेवोनी उत्कंठेनें-वाचावा गत इतिहास
भिजवावीं त्याचीं पानें-सोडावा दीर्घोच्छ्वास
नयनीं किल्ले पाहोनी-व्हावें चित्तांत उदास
आठवून त्या त्या गोष्टी
लक्षून आजची सृष्टी
अंतरांत व्हावें कष्टी
येती वच सहजीं वदतां—एक काळ ऐसा होता १०

# " एक काळ ऐसा होता "

## भाग तिसरा.

राघोबा कोठें आहे ?-अहमदाबाद वेशीला
कोणी ह्मणती छे ! भिडला-अजमीराच्या कोटाला !
इतुक्यांत बातमी आली-थडके तो मुलतानाला ! !
जों अधिपति लाहोराचा—
पोषाख चढवि युद्धाचा
सेनापति पुण्यपुरीचा—
थडके लाहोरा पुढता ! ! !—एक काळ ऐसा होता १

कृष्णा—कांठाचे घोडे-अटकेला पाणी प्याले
सह्याद्रीचे रणशूर-ते हिमालयाला भिडले
हस्तिनापुराची लक्ष्मी-ढालेवर घेउन आले
त्यांना तैं अडवायाची
छाती नव्हती एकाची
घटिका वैभव-काळाची
येतात अश्रु आठवितां—एक काळ ऐसा होता २

हैसुरचा वाघ निवाला-सावनूर काबिज केलें !
धारवाडच्या रोखानें-पंजाचे डावचि खेळे ! !
खेळ खेळ बेटा ! खेळ-पाहा पण उँघडुनि डोळे !
युद्धाचे तालिमवाले
पटवर्धन चालुन आले
पाहातांच सावज लोळे
स्फुरते तनु ज्यातें स्मरतां—एक काळ ऐसा होतां ३

हैदराबादचे वीर-पाणी राखाया झटती
भाऊच्या समशेरीचें-पाणी चाखोनी पळती !
राहील कोठचें पाणी !-पाण्यानें तोंडें सुकतीं !
हत्तीच्या सोंडेवरतीं
घोड्यांच्या तोंडावरतीं
जय-चिन्हें शोभा देतीं
शौर्य-श्री-वर्धनकर्ता-एक काळ ऐसा होता ४

एका निजराष्ट्रासाठीं-विप्र, क्षत्रिय ते वैश्य
ज्ञातिभेद विसरुन अपुला-व्हावे एकत्र समस्त
एकीचें कळलें होणें-सकलां चित्तीं स्वारस्य
त्या देशोन्नतिच्या कालीं
स्वातंत्र्य-निशाणाखालीं
देशभक्त वेळोवेळीं
यावेत सोडुनी स्वार्था-एक काळ ऐसा होता ५

गारदी फौज खानाची-संगीन खोंवुनी चाले
ग्वालेरीच्या पागेचे-सरदार तोलती भाले
माळवी रिसाले भव्य-हेषा-रव करिते झाले
पांढऱ्या गजावर बसुनी
पेशवे निघाले सजुनी
इंद्राची स्वारी ह्मणुनी
भास हाच व्हावा चित्ता-एक काळ ऐसा होता ६

गड दुर्ग न ऐसा उरला-जिंचला न ज्याला भाला
ऐसा न कोणता प्रांत-जो पुण्यपुरीस न भजला

भूपती न ऐसा कोणी-श्रीमंतांस न जो लवला
ज्या दिशेस मुख फिरवावें
तेजाचे किरण पडावे
डोळे हे दिपुनि जावे
वैभव-रवि होता चढता-एक काळ ऐसा होता ७

गारांचा पाउस बरवा-बरवी न वृष्टि शिंद्यांची
स्वारी जी होळकरांची-त्याहून बरी व्याघ्राची
धडगति ना यैद्वाची-त्यांनाच गांठ फडक्यांची
ज्यांची शत्रूंना भीति
अत्यंत वाटली चित्तीं
गेल्या गेल्या त्या मूर्ति
तोंडानें बोला आतां-एक काळ ऐसा होता ८

" हर! हर! " गर्जोनी गेला-ध्वनि दोन्हीही टोंकाशीं
हर देई याची साक्ष-रामेश्वर काशीवासी
ऐकाया येइल काय?-रवि रोज येइ उदयासी
गिरिशिखरावर जाऊन
रणतीर्थांना पाहून
स्थिति एकंदर जाणून
चंडांशुहि स्मरतो बुडतां—एक काळ ऐसा होता ९

# "एक काळ ऐसा होता"

## भाग चवथा.

कोरेगांवाच्या पगड्या-खुंटीवर झळकत होत्या
अष्ट्याच्या संग्रामाच्या-तरवारीं लटकत होत्या
बंदुकीमुळें फुटलेल्या-गेहिं गेहिं ढाला होत्या
गाजविलेल्या शौर्याचा
ओढवलेल्या दैवाचा
इतिहास मुखें शेवटचा
सांगती शूर हळहळतां-एक काळ ऐसा होता १

पारतंत्र्य-शय्येवरती-भारत निजलेला होता
आंखडून साऱ्या नाड्या-दम छातीमध्यें होता
आकळ्या दिल्या जोरानें-शेवटीं अचेतन होतां
मिरतेला उठला बार
कानपुरीं झडली फैर
दिल्लीस माजलें वैर
दीप होय मोठा विझतां-एक काळ ऐसा होता २

झाले नानासाहेब—साहेबांचे तैं काळ !
केले तात्या टोप्यांनीं-टोपीवाल्यांचे हाल
झांशीची लक्ष्मी अबला-प्रबलांशीं करि कल्लोल
आला हाताशीं स्वर्ग
मिरवी जो तो निजगर्व
भूपाल ह्मणवती सर्व
कोणी न कुणाचा शास्ता-एक काळ ऐसा होता ३

मर्दांच्या मर्दुमकीचे-पोवाडे रचिले जातां–
लढवय्यांच्या नांवाची-ती थाप डफांवर पडतां–
स्वातंत्र्याच्या काळाला-शाहिर हौसेनें गातां.
तों सुधारणा नव आली
गेलेल्या वैभव-कालीं
भुरळ तीं मनाला घाली
तिजला ही भुलली जनता-एक काळ ऐसा होता ४

देवधर्म मानुन झूट-घालावा भलता वाद
संध्यास्नानें राहोत-जावें नित हाटेलांत
भक्षावें तेथ अभक्ष्य-तें अपेय-पान करीत
डबक्यांतिल मंडुक जैसे
पंकिल भक्षोनी घोषें
डरडरती कटु आवेशें
बोलाव्या तैशा बाता-एक काळ ऐसा होता ५

परक्यांची संस्कृति गावी-निंदावें वंद्य ऋषींना
आचार उचलुनी त्यांचे-हिणवावें साधुजनांना
देव्हारें मांडुन त्यांचें-हांसावें देव्हाऱ्यांना
आर्यांच्या सद्वेदांचा
आचार्यांच्या ग्रंथांचा
अभिमानहि नुरला साचा
पोषाखांतहि परवशता–एक काळ ऐसा होता ६

इंग्रजी शिकोनी थोडें-पुस्तकी ज्ञान मिळवावें
एखादी पदवी मिळतां-विद्वान ह्मणुन मिरवावें
वाणीचें तांडव करितां-परशद्ब मधें घालावे
देशाच्या पोकळ गोष्टी

२३५१३

करितांना केवळ ओष्ठीं
एकाला दुसरा पृष्ठीं
देई, श्रम कांहिं न करितां—एक काळ ऐसा होता ७

विल्यम्साचें ह्मणणें कीं-' कालिदास सत्कवि कसचा ? '
मानिएर बोले त्याला[1] ' कर्ता कृत्रिम कवितेचा '
आह्माला मान्य असाव्या—मत्सर-ग्रस्त तद्वाचा !
अमुच्या विद्वद्रत्नांना—
परके निंदित असतांना—
आह्मीं तुकवाव्या माना !
ग्रंथही न केवळ बघतां—एक काळ ऐसा होता ८

' शिव भूप लुटारू होता '-ढोलकें अह्मीं बडवावें !
' अक्षर-ओळख त्या नव्हती '-तुण तुणें अह्मीं ताणावें !!
' विश्वासघातकी होता '—सूरांत सूर मिसळावे !!!
मुकलों राज्याला जैसें
मुकलों बुद्धीला तैसें
कोणीं सांगितलें जैसें
मानावें तैसें चित्ता-एक काळ ऐसा होता ९

जोंवरी विष्णुशास्त्र्यांनीं-लेखणी उचलली नव्हती
लेखणी कशाची छे-हो !-स्वाभिमान दीपज्योती
जोंवरी लोकमान्यांची-निश्चयांत मूर्ती होती
निजपूर्वज-वंचक तोंची
आपुली खांच उदराची
भरण्यासाठीं स्वत्वाची
दिसले जैं विक्री करितां—एक काळ ऐसा होता १०

---

१ कालिदासास.

# "मर्दानी झांशीवाली"




झांशी खालसा झाल्यानंतर १८५७ सालीं स्वातंत्र्य-लक्ष्मीनें संचरित झालेल्या झांशीच्या **लक्ष्मीनें** सर ह्यू रोज सारख्या रणकलापटूशीं १२ दिवस सारखें युद्ध केलें. इंग्रजांनीं झांशीवर कुलपीगोळ्यांचा भडिमार केला; किल्ल्यांतील दारूचा भडका उडाला; साह्याला आलेल्या **तात्या-टोप्यांच्या** २० हजार फौजेचा पराजय झाला आणि शेवटीं तटाचा मुख्य दरवाजा फुटून शहरांत व तटावर गोऱ्या फौजेचा प्रवेश झाला! या संकटपरंपरेनें धैर्यवंतांचेंसुद्धां धैर्य

ढासळावयाचें. पण त्याच वेळीं ही धैर्यमेरुवरील अविचल तारा कमरेची नंगी तरवार उपसून तटावर छातीचा कोट करून लढली. तेथून बेफामपणानें शत्रूच्या पाठोपाठ शहरांत घुसली व तेथें त्यांची गर्दनबाजी केली. तिच्या समशेरीला भिऊन पळालेले इंग्रज जेव्हां दुरून लपून-छपून गोळ्या घालूं लागले तेव्हां तिनें आपल्या ढाला किल्ल्यांत फिरविल्या. तिच्या शौर्यानें आनंदित झालेल्या सर ह्यू रोजानें "**मर्दानी झांशीवाली**" असा तिचा गौरव केला.

* * *

झांशिच्या कुहरामध्यें-सिंहीण निजे घायाळ
गर्जना उठे भंवतालीं-स्वातंत्रेच्छूंचा काळ
लावाया भाग्य कसाला-तेजस्विनि करि कल्लोल
बुरुजा बुरुजावर मोर्चे
बांधोनीया तोफांचे
सजविलें सैन्य शूरांचें
आपणही वेषें सजली-मर्दानी झांशीवाली १

यत्कर परिचित झालेले-खड्गाच्या भव्य मुठीस
यत्कर्ण सदा उत्साही-ऐकाया रणघोषास
यन्नेत्र नित्य अनुरागी-आरक्त रणस्थानास
'ह्यू रोज' आंग्ल नरवीर
झांशिच्या तटावर धीर
आपटून झाला जेर
हिंदींत बोलला बोली-"मर्दानी झांशीवाली" २

गर्नाळी कुलपी गोळे-खदिरांगारासम सुटले
पसरली लाल चादर कीं-अंधाऱ्या रात्रीं गमलें
धुम्-धडड्ड्-धडड्ड् नादें-आकाश भरोनी गेलें
"घनगर्ज" तोफ जैं गर्जे
मोर्चावर गोरे जे जे
त्यांच्यांत पलायन माजे
विजयिनी जयें फुरफुरली-मर्दानी झांशीवाली ३

फितुरानें केली मात-कलिजास पोंचला हात
दारूच्या कोठारांत-जेजालांची बरसात
किल्ल्यांत आणि नगरांत-मृत्यूचा प्रळयाकांत
शहराला जागोजागीं
लागल्या भयंकर आगी
पाहिली प्रजा हतभागी
वात्सल्यें हृदयीं द्रवली-मर्दानी झांशीवाली ४

'बोलवा गोशखानाला-बोलावा खुदाबक्साला
गरगंजाच्या बुरुजाला-आणवा कडक बिजलीला
भूतो न भविष्यति ऐशी-उडवा दक्षिण बाजूला
जों तिसरा सुटला बार
तों कर्नल झाला ठार
नंतर चमके तलवार
तलवारीवरही लढली-मर्दानी झांशीवाली ५.

१ 'घनगर्ज' व 'कडकबिजली' ह्या लक्ष्मीबाईच्या नामांकित तोफा होत्या २ गोशखान व खुदाबक्स हे लक्ष्मीबाईचे गोलंदाज होते.

पडघम त्रिगुलांच्या नादीं-शिंगें कर्णांचे नाद
खालीं वरती भरलेला-संग्रामाचा उन्माद
चढत्या ईर्ष्येच्या शद्वीं-चढत्या विजयाचे शद्व
जातीची अबला होती
युद्धकला ठाउक नव्हती
प्रबलांची केली माती
इतिहासीं गाजुन गेली-मर्दानी झांशीवाली ६

उत्तरेस धुरळा दिसतों-आशेनें राणी पाहे
" तात्या टोपे आले का ? "--उत्कंठा लागुन राहे
तों " तात्या आले आले ! "-आनंद गडांत न मावे
टोप्यांनीं टोपीवाले
समशेरीवरतीं धरिले
एकदांच चालुन गेले
इकडे चपला चकमकली-मर्दानी झांशीवाली ७

युक्तीं-युक्तीचें युद्ध-शक्तीला गिळुनी बसलें
पहिलीच फळी जों आली-फोडून रिसाले गेले
दे माय धरणि गे ठाव-ऐसें सकलांना झालें
स्वारांचा पायदळांचा
हल्ला चढला जोराचा
दळभार पळे तात्यांचा
थरकेना हिंमतवाली-मर्दानी झांशीवाली ८

द्वादश दिवसापर्यंत-एकटीच झुंजत होती
साह्याला टोपे आले-त्यांची गति ही उफराटी

सर ह्यू रोजाच्या कुमकीं-दररोज पलटणी येती
अंगाची होउन लाही
कर्तृत्वशक्तिला वाही
भवितव्यतेस ना पाही
भीतीही तिजला भ्याली-मर्दानी झांशीवाली ९

धैर्याच्या मेरूवरची-तेजस्वी अविचल तारा
शौर्याच्या जलनिधिवरची-भीषण सिंधूची धारा
जमवोनी संगरशूरां-बोले ती धीरोदारा
" व्यर्थ-ती परांची आस
आपुल्या बळाची कास
घालून जपा झांशीस "
उठली आवेशें भरली-मर्दानी झांशीवाली १०

पायजमा पायीं शुभ्र-गहिरा अंगरखा अंगीं
कमरेस दुपेटा भारी-समशेर लटकली जंगी
शोभली शिरीं चंदेरी-सुंदर बत्ती नारिंगी
झांशीच्या सौभाग्याची
मूर्तिमंत लक्ष्मी साची
देवता रणस्थानाची
किल्ल्यांतुन बाहिर आली-मर्दानी झांशीवाली ११

इंग्रजी रिसाले पुढतीं-क्यॅाटिजंट फौजा मागें
दारावर दौडत आले-लेफ्टनंट कर्नल वेगें
इकडे ही हुलड; तिकडे-बावटा तटाला लागे
अरबांची बुंदेल्यांची
कर्नल क्यॅाप्टन गोऱ्यांची

ग्रंथ संग्र... नं. ... नों. ... ता...

पाहून झुंज निकराची
उफळोनी नागिण आली-मर्दानी झांशीवाली १२

पहिल्या झेपेनें घेई-" मिकलीजाना " चीं जानें
दुसऱ्या उसळीनें घेई-" बोनस फॉक्सो " चे प्राण
" डॅकाला " केला शीक-मुरडून हात मारून
" स्टूअर्ट " " लोथ " दोघांनीं
गर्दींत शिडया लावोनी
चढविलें सैन्य पाहोनी
उफळोनि वाघिण गेली-मर्दानी झांशीवाली १३

गिरिवरची जैशी सरिता-तट भिजवित पुढतीं जाते
झंझावाताची लहरी-उच्छेदित वृक्षां जाते
घनमंडलिं जैशी बिजली-जेथें तेथें लखलखते
कीं भूकंपाची लहरी
अचलांसहि कांपविणारी
सर्वत्र फिरे अनिवारी
संवोगिनि तैशी गमली-मर्दानी झांशीवाली १४

आरक्त उषा ती गमली-आरक्त चंडिका गमली
संतप्त भासली संध्या-संतप्त भासली काली
संक्षुब्ध तिच्या नेत्रांत-क्रोधाची चढली लाली
लखलखाट मार्तंडाचा
चकचकाट पूर्णेंदूचा
दाविला खेळ तेजाचा
रक्तानें शरिरीं न्हाली-मर्दानी झांशीवाली १५

पुढचा दरवाजा फुटला-बाणींचा तटही गेला
सुंदरिचे हात न पुरले-अष्टदिशा सांवरण्याला

कावरी बावरी झाली-शहरांत घोळका घुसला
शत्रूच्या पाठोपाठ
अरबी लढवय्यांसहित
घातली उडी शहरांत
करि कत्तल हिय्येवाली-मर्दानी झांशीवाली. १६


छातीस लागतां छाती-संगीन सरकली मागें
तरवारीवर तरवार-खणखणाट होऊं लागे
अरबांनीं बेहोषानें-शिरकटाई केली वेगें
सरमिसळ होउनी राणी
गर्दनबाजींत शिरोनी
गेली होती रंगोनी
शिरशिरी भरोनी लढली-मर्दानी झांशीवाली १७

झाडांच्या मागें कोणी-झुडुपांच्या मागें कोणी
पडवीच्या मागें कोणी-वळचणिच्या मागें कोणी
भीतीनें लपुनी छपुनी-सोडिती बंदुका दुरुनी
चहुंकडून आल्या टोळ्या
त्यांच्याही सुटती गोळ्या
किल्ल्यांत फिरविल्या ढाला
मर्दांना मर्दुन गेली-मर्दानी झांशीवाली १८

रणकलाकुशल वीरांनीं-कौशल्य गाइलें जीचें
गुणवंत ग्रंथकारांनीं-ग्रंथिले समरगुण जीचे
पोवाडे गावे वाटे-स्वातंत्र्याच्या हिरकणिचे
स्फूर्तीचे वळसे दिधले
मृत पौरुष जागृत केलें
हतबल बलवंताहि केले
भारतास भूषण झाली—मर्दानी झांशीवाली १९

# " घनगर्ज. "

## ( तोफ. )




—सातव्या—दिवशीं तर विलायती तोफखान्यानें झांशी-वर कहर करून सोडिला. बुरुजावरील मोर्चावर मनुष्य ठरेनासा झाला तेव्हां **लक्ष्मीबाईनें** तोडीस तोड देण्या-करितां आपली नामांकित " **घनगर्ज** " तोफ सुरू केली. तिच्या भीषण गडगडाटानें दशदिशा दणाणून गेल्या व भयंकर भडिमारानें इंग्रजांचा तोफखाना बंद पडला; इतकेंच नव्हे तर **सर ह्यू रोजा**ला आपली छावणी मान्यांतून मागें सरकवून घ्यावी लागली ! !

* * *

जैं विलायती तोफांनीं—झांशीचे केले हाल
पेटला गणेशमहाल—पेटला विलासमहाल
ऐश्वर्य आणि सुंदरता—फुटलें फुटलें तद्धाळ
' घनगर्ज ' शत्रुसंहरिणी
जणुं काळाची ती भगिनी
मोर्चात तिला ठासोनी
प्रगटतां लक्ष्मिचा कोप—घनगर्ज गर्जली तोफ १

भूधर शेषाचें शीर्ष—भीतीनें कांपविणारी
नाभीकमलाच्या विधिला—चल-विचलित जी करणारी
देवांच्या सम्राटाचें—सिंहासन हालविणारी
गर्जना अशी जैं झाली
स्त्रीगर्भहि ढळले खालीं
धडकी वैऱ्यांना भरली
पळतांना करिति विलाप—" घनगर्ज गर्जली तोफ!" २

धीरांचें सुटलें धैर्य—वीरांचें थिजलें वीर्य
प्रगटलें परचमूमध्यें—भीषण काळाचें क्रौर्य
सर ह्यू रोजाला गमलें—तें संकट बहु अनिवार्य
आकाश प्रतिध्वनि देई
दिग्गिरी प्रतिध्वनि देई
महि नभास भेटूं पाही
ऐसा दावीत प्रताप—घनगर्ज गर्जली तोफ ३

झांकून सूर्य-गोलाला—चमकवी गोलसूर्यातें!
उडवीत मागुनी ठिणग्या—दिवसाच मिरवि तारांतें!
भर ग्रीष्मऋतूच्या कालीं—उभवी वर्षाकालातें!
कर्तुमकर्तुं शक्तीचा
यत्प्रभाव कुंठवि वाचा
चढुनी शिखरीं त्वेषाच्या
पाप्यांचें मोजित पाप—घनगर्ज गर्जली तोफ ४
दुर्बीण लाविली ज्यानें—त्यावरीच धरिला नेम
उडविला यशस्वी बार-दाविलें यमाचें धाम

पळतांना मोर्चेवाले-झाले किति घामाघूम
पैजेवर लावुन पैज
चतुराई गोलंदाज
दाखवीत होते आज
प्राशून दारुची वाफ- घनगर्ज गर्जली तोफ ५

ठासतो एक जों दारू-तों दुजा चढवितो गोळा
आगीचा तोडेवाला-निरखुन मोह्ऱ्या मोह्ऱ्याला
गडगडाट करण्या लावी-त्या निनादिनी तोफेला
प्रत्येक निनादासरसे
धूमकेतु उगवत होते
भीषण नभ भासत होतें
रिपुमदास लावित धाप-घनगर्ज गर्जली तोफ ६

रोमांच उठति जों देहीं-तों होय देह विच्छिन्न!
कांपरे भरे करचरणीं-करचरण होति तनुभिन्न!!
धडकी भरली जों हृदयीं-तों हृदय होय संचूर्ण!!!
निर्मनुष्य केले मोर्चे
धमधम्यांत जेजालांचे—
सांपळे उभे तोफांचे
अपजयास मारुन थाप-घनगर्ज गर्जली तोफ ७

राणीचे गोलंदाज-स्फूर्तीच्या शिखरीं चढले
विजयोत्साहाची सरिता-राणीच्या हृदयीं खेळे
नेमाचा सुटतां बार-"शाबास बहाद्दर!" बोले

छावणी सरकली मागें
पलटणी सरकल्या मागें
त्या भडिमाराच्या योगें
शमवीत असा रिपुताप-घनगर्ज गर्जली तोफ ८

दास्याची कैदासिण जी-अस्मान तिला दावाया
परवशता जखणीच्या कीं-ठिकऱ्या ठिकऱ्या उडवाया
या सुवर्णभूमीचें तें-स्वातंत्र्य रुचिर राखाया
राज-लक्ष्मिची गुणवंती
शूरलक्ष्मि ती यशवंती
घनघोर युद्ध करी अंतीं
तिज द्याया साह्य अमूप-घनगर्ज गर्जली तोफ ९

# “फेकला तटाहुन घोडा !”

इंग्रजांच्या बलाढ्य फौजेशीं झांशीची **लक्ष्मी** सतत १२ दिवस अमानुष पौरुषानें लढली. शत्रूंनीं झांशीचें तर केवळ स्मशान करून सोडिलें. त्यांची चहुंकडून हुल्लड उठली व ती किल्ल्यापर्यंत पोंचली. किल्ल्याच्या मुख्य दरवाजाचें रक्षण करणारे राणीचे चतुर गोलंदाज ‘**कुंवर गोषखान** ’ व ‘ **गुलाम खुदाबक्ष** ’ हेही गतप्राण झाले. आतां हस्तगत होऊन देहाचे हाल करून घेण्यापेक्षां शत्रूची फळी फोडून बाहेर पडावें आणि काल्पीस **नानासाहेब** व **तात्याटोपे** यांस जाऊन मिळावें असा तिचा धडाडीचा निश्चय झाला ! तिनें आपल्या प्रियपुत्रास पाठीवर बांधिलें, आवडत्या खंद्या घोड्यावर चढली आणि बरोबरच्या निवडक धैर्यवान् सेवकांसह तिनें उत्तरदिशेनें भरसैन्यांत तटाहून घोडा फेकला व फळी फोडून निघून गेली ! **सर ह्यू रोज**सारखा चतुर सेनापती पण तोही तिच्या या अचाट धैर्यानें चकित झाला. त्यानें तात्काल लेफ्टनन्ट **बौकर** यास तिच्या पाठलागावर पाठविलें ! सकाळीं झांशीप्रांताच्या सरहद्दीवर ती मुलास फराळास घालीत असतां **बौकर**ची दौड तेथें जाऊन भिडली. तिनें चपळाईनें मुलास पुन्हां पाठीवर बांधिलें आणि घोडेस्वार होऊन तरवारीच्या पहिल्याच खणाखणींत **बौकर**ला घायाळ करून निघून गेली !!

* * *

लक्ष्मिचा धैर्यतट अढळ-जरि झांशीचा तट ढळला
तन्निश्चय-बुरुज न हाले-एकेक बुरुज जरि पडला
परि वेढ्याच्यां पाशांनीं-जखडाया वैरी सजला
काळकंठ जे चिरतील
प्राणास प्राण देतील
घेऊन असे रणशील
फोडाया दुर्गम वेढा-फेकला तटाहुन घोडा! १

मर्दानी बांधुन फेटा-चिलखत चढवी अंगांत
जहरी जंबिया कमरेला-नंगी समशेर करांत
पाठीस बांधिला पुत्र-कुरवाळुनि वात्सल्यांत
" अस्मान फेक " जातीच्या—
वेगीं चढत्या छातीच्या—
तुरगीं चढली त्वेषाच्या
सरकावुन मागें थोडा-फेकला तटाहुन घोडा! २

नभ विदारुनी तेजस्वी-ही वीज उडाली काय?
भीमाच्या हातामधली-कोसळे गदा कीं काय?
निखळून स्वर्गद्वाराची-अर्गलाच पडली काय?
क्षण भास असा तैं झाला
प्रत्येक पहारेवाला
विस्मित होवोनी ठेला
दाखवीत गगनक्रीडा-फेकला तटाहुन घोडा ३

दचकले कडाक्निवाले-गोंधळले बंदुकवाले
सरले समशेरीवाले-हटलेही संगिनवाले

उधळोनी सिंहिण गेली-चित्रापरि सारे ठेले
जों मान वळवुनी बघती
तों प्रभावती लक्ष्मी ती
जाय दिक्पथाच्या अंतीं
तो अडला नाहीं थोडा-फेकला तटाहुन घोडा ४

शत्रूची विजयी टोपी-टापेनें उडवुन दिधली
उतरली मिशी चढलेली-प्रबलांतुन अबला गेली
लेफ्टनंट बौकर धावे-स्वारांची घेउन टोळी
वायूची लहरी चाले
दर्याची लहरी हाले
अधिकाधिक अंतर पडलें
रागांत नवल करि वेडा-फेकला तटाहुन घोडा ५

भिडविली एकदां मांड-रतिभरही चळली नाहीं !
मारिली एकदां टांच-ती पुन्हां शिवविली नाहीं ! !
रिकिबीचा चढतापाय-थोडाही लवला नाहीं ! ! !
अनिनीच्या झटक्यावरतीं
घोड्याला खुणवित होती
शर्यतींत धांवत होती
तिज काय अडवि नादि-ओढा-फेकला तटाहुन घोडा ६

देह जरी चाले पुढतीं-प्राण तरी होता पृष्ठीं
चौखूर उधळतां घोडा-तोलून धरी सुत-यष्टी
तो कण्हून " आई ! " वदतां-अंतरांत होई कष्टी

सोडिला तिनें दौलतिचा
वाडा तो समृद्धीचा
परि एकच तो जीवाचा
पाठीला घेउन वाडा-फेकला तटाहुन घोडा ७

सारीत तमःपट आली-ती उषा पूर्व दिक्क्षितिजीं
स्वातंत्र्य-गोल सूर्याचा-सरसरला व्योमामाजीं
आवरी जरा लक्ष्मी ती-झाशिंच्या सिमेवर वाजी
सोडिला बाळ पाठीचा
घातला घास प्रेमाचा
दिसला घोडा बौकरचा
ही तेव्हांची रिपुपींडा-फेकला तटाहुन घोडा ८

चपला जों चपलाईनें-पाठीस बांधिते बाळ
मारिते टांच घोड्याला-तों बौकर भिडला काळ
मारिला हात उलटून-उलथला दुष्ट घायाळ
वृक्षांच्या शिखरावरुनी
उधळली धूळ पसरोनी
दास्याचा पायांतूनी
तेव्हांच तोडिला खोडा-फेकला तटाहुन घोडा ९

राष्ट्राच्या कल्याणार्थ-कल्याणिनि करि कल्लोल
ती प्रिय भारतभाग्यार्थ-भागीरथि झाली लोल
आर्यांचे बघुनी हाल-हालवी मही दिग्गोल
मर्दानी झांशीवाली
परवशता पायांखालीं
चिरडून निघे जयशाली
स्वातंत्र्याचा मनिं ओढा-फेकला तटाहुन घोडा १०

# " काल्पीस करी कल्पांत ! "

**झांशीच्या** तटाहून घोडा फेंकून निघून गेल्यानंतर राणी **लक्ष्मीबाईनें** मुलाला पाठीला बांधिलेल्या स्थितींत अन्नपाण्यावांचून २४ तासांत काल्पीपर्यंत १०२ मैलांची मजल मारिली ! तेथें **नानासाहेब**, **तात्या** टोपे व **बांदे-वाले** नबाब यांच्या फौजांची तिनें विलक्षण रचना करून **काल्पीचा** कोट दुर्भेद्य केला. **पेशव्यांनीं** या सेनेचें आधिपत्य त्या चतुर सांग्रामिकेकडे द्यावयास हवें होतें. तिनें आपले लालवर्दीचे निवडक २०० लोक घेऊन यमुने-कडची बाजू सांभाळली. **तात्या** टोपे, **बांदेवाले नबाब** यांचा जेव्हां **कुंच** व **काल्पी** यांच्या अघाडीवर पराभव झाला तेव्हां नानासाहेबांसहित सर्वच पलायनाचा विचार करूं लागले ! **राणीनें** त्यांस धीर दिला व आपला उमदा घोडा पुढें काढून लालवर्दीच्या लोकांनिशीं **इंग्रजांच्या** नामांकित तोफखान्यावर २० फूट अंतरापर्यंत बेधडक चाल केली व तो बंद पाडला. तिच्या यावेळच्या भयंकर वीरश्रीनें व अचाट पराक्रमानें कर्नल, **क्यॉप्टन** वगैरे इंग्रजवीर हतवीर्य होऊन रण सोडून पळूं लागले ! तिनें या काल्पीच्या युद्धांत शौर्याचा कल्पांत केला. तेव्हां ऐनवेळीं सेनापति **सर** ह्यू **रोज** हा आपला उंटांवरचा तोफखाना घेऊन धांवत आला. त्यानें **पेशवे** व **नबाब** यांना उधळून लाविलें व अशाप्रकारें **राणीची** पिछाडी तोडिली ! तरी देखील त्या तेजस्वी योद्ध्याला या एकट्या

तेजस्विनीनें चांगलेंच तेज दाखविलें, आणि पुन्हां डोळ्यां देखत घोडा उडवीत निघून गेली ! !

*　　　*　　　*

झांशीच्या किंकाळ्यांचे-पडसाद श्रवणीं येती
उन्मत्त शत्रुचीं कृत्यें-हृदयाचीं शकलें करिती
नाचवीत कोपभ्रुकुटी-काल्पीवर ये लक्ष्मी ती
सागरास आली भरती
धैर्याचे सेतू बुडती
त्यांवरि लहरी नाचे ती
सळसळून रक्त देहांत-काल्पीस करी कल्पांत १

टोप्यांनीं केली कूच-कुंच्यावर डेरे दिधले
बाणपूर बांदेवाले-ढाला बांधोनी गेले
स्वातंत्र्यविजयदेवीचीं-जमलीं उत्साही बाळें
शौर्यांत कुशलता नव्हती
धैर्यांत चतुरता नव्हती
मळवून पताका येती
ज्वालेपरि लक्ष्मि नितांत-काल्पीस करी कल्पांत २

चौफेर उभारुनि तोफा-काल्पीला केला कोट
निवडुनी पठाणी फौजा-बांधिला तयांचा गोट
सकलांनीं निश्चय केला-यमुनेचा प्राशुन घोट
श्रीमंतांची श्रीमंती
यशवंतांची यशवंती
कीं मेघांतिल चपला ती
चमके स्वातंत्र्योद्भ्रांत-काल्पीस करी कल्पांत ३

तोफांस लागतां तोडे-उधळले रिसाले घोडे
बीनीवर निधडे भिधडे-स्वर्गाचे बघती वाडे
आंग्लवीर गाढे गाढे-भीतीनें झाले वेडे
केवळ शौर्याची ज्वाला
काळी जहरी अहिमाला
गमली सर ह्यू रोजाला
ऐशा शौर्यावेशांत-काल्पीस करी कल्पांत ४

स्वातंत्रेच्छा ती इकडे-तिकडे अधिकारोन्माद
रणभेरी गर्जती इकडे-तिकडे बिगुलांचे नाद
निश्चयी वृत्तिचा जोर-सूडाला करि अवरोध
दाढीवर चढवुन वादी
हायलंडर ते बेदर्दी
छबिन्यावर करिती गर्दी
अधरोष्ठीं चढला दांत-काल्पीस करी कल्पांत ५

हुजुरातीच्या बाजूला-हल्ल्यावर चढवित हल्ले
स्टूअर्ट आणि राबर्ट-सरसावुन पुढतीं आले
टोपे, नानासाहेब-भारतीय शौर्ये लढले
योजून देहसंकल्पा
रोखून भयंकर तोफा
वदती कीं " कापा, कापा ! "
उडविला असा आकांत-काल्पीस करी कल्पांत ६

शत्रुच्या पौरुषावरतीं-फेंकले निखारे तीनें
झुलणारे मत्त गजेंद्र-" किर्र किर्र " केले तीनें

मर्दुमकीच्या मगरीचे-पाडियले दांत बलानें
“ पूर्वीच्या लौकीकाळी
‘ सेनापति ’ या पदवीची
लाज केंवि राखायाची ? ”
करुनी रिपु चिंताक्रांत-काल्पीस करी कल्पांत ७

लेफ्टनंट, कर्नल वदती-“ लक्ष्मीनें केली शर्थ ”
हतवीर्य ब्रिगेडिर वदती-“ राणी रणचतुर समर्थ ”
त्या गुणज्ञ सेनानींना-धिक् गमला निजपुरुषार्थ
डोळ्यांत लक्ष्मिची मूर्ति
हृदयांत मृत्युची भीती
बावरून गेली वृत्ती
खड्गावर चढवुनि हात-काल्पीस करी कल्पांत ८

कडव्या हायलंडर सेना-संगिनिवर जय मिळवाया
पलटणी हैदराबादी-बंदुकिचें बल दावाया
वेगानें चालत आल्या-काळाची मोजित छाया
“ झांशीचा घ्या, घ्या सूड
उकला स्वयशाचें गूढ ”
गर्जे ती अश्वारूढ
शिरली कापाकापींत-काल्पीस करी कल्पांत ९

भरंवसा जयांचा त्यांनीं-अगदींच गाळले हात !
राखावी पाठ जयांनीं-त्यांनींच फिरविली पाठ !
जीवाचे रक्षक सारे-शोधिती पळाया वाट !

दाबून अश्व मांडीनें
दाबून खड्ग हातानें
राजेश्वरि संतापानें
उसळली उग्र रूपांत-काल्पीस करी कल्पांत १०

उमद्या घोड्याच्या टापा-"खाड खाड" उडवित आली
प्राशून आग तोफांची-मोर्चांत चढाई केली.
गोऱ्या तोंडावर गौरी-खिन्नता चढविती झाली
ती धरून ज्यावर रोंख
करि समशेरीची फेंक
तो सोडी हा भू-लोक
लाली चढली नेत्रात-काल्पीस करी कल्पांत. ११

नामर्द जाहले मर्द-मर्दानीच्या शौर्यानें
हत विक्रम विक्रमवंत-केले विक्रमवंतीनें
पौरुषास पुरुषार्थाला-सजविलें प्रभावंतीनें
गिरि गिरीवरी आदळले
घन घनावरी कोसळले
भूस्वर्ग एक तें झाले
रक्ताच्या वर्षावांत-काल्पीस करी कल्पांत १२


सेनानी ह्यू रोजाचा-उंटांचा भव्य रिसाला
आगीला वर्षत आला-गत यशास रक्षायाला
जयमरणनिश्चयें सजली-ती विद्युला संग्रामाला

रणधीर आंग्लनर योद्धा
रणरागिणि ही कटिबद्धा
अत्यंत जाहली क्रुद्धा
महिषासुरमर्दिनि मूर्त-काल्पीस करी कल्पांत १३

मोहिनिच्या आविर्भावें-भस्मासुर नाचत होता
यमुना जललहरी संगें-कालिया उफाळत होता
ज्योतिष्मतिच्या तेजांत-धूमकेतु चमकत होता
दोनशें लोक राणीचे
पर्वतप्राय देहाचे
शर्थीनें लढले साचे
उत्साह तयांना देत-काल्पीस करी कल्पांत १४

एकाच चंडिकेवरती-चवताळुन राक्षस गेले
एकाच भद्रिकेभंवतीं-ते अभद्र सारे जमले
ती कल्लोलिनि तन्मार्गीं-पाषाण आडवे आले
वळसे घेवोनी नाना
उत्सारित सन्नद्धांना.
गेली—जातां जातांना
या प्रिय भारत-भाग्यार्थ-काल्पीस करी कल्पांत १५

# "केवळ देशाकरिता !"



"स्वदेशाकरितां लढतां लढतां सभरांगणावर पतन पावलेल्या आपल्या पुत्रानें आणखी काय सांगितलें ?" असें बापानें गहिंवरून विचारिलें. तेव्हां अंतसमयीं जवळ असलेला त्याचा मित्र बापास त्या मृतवीराचें शेवटचें भाषण सांगत आहे:—

* * *

प्रिय-पुत्र दिवंगत झाला-स्वातंत्र्य-रणीं लढतांना
तन्मित्रें शोकद-वार्ता-कथिली मातापितरांना
मातेची शुद्धी गेली-करि विलाप भगिनी नाना
' बाळ काय वदला अंतीं ? '
पुसतसे तात शोकांतीं
कथि तदंत्य-वाणी तो ती—
" जन्मुनी धन्य मी झालों-देशाच्या कामीं आलों " १

' शूरांच्या वंशीं शूर-वीरांच्या सुकुलीं वीर
मर्दांच्या पोटीं मर्द-धीरांच्या उदरीं धीर '
मज जागृति या वचनांची-देत होति ही **समशेर**
कुलदेवी हीच भवानी
कुल-पुरुषांनीं वंदोनी
कुल भूषविलें सकलांनीं
तें यश रक्षाया झटलों-देशाच्या कामीं आलों २

उलटला रंग युद्धाचा-' घे मार ' सुरू जैं झाली
स्मृति झाली तैं स्वजनांची-क्षण वृत्ती होय निराळी
तों " **केवळ देशाकरितां** " हीं ध्वजाक्षरें वाचियलीं

तेव्हांपासुन खड्गानें
किति रक्त प्राशिलें नेणें
तें तेंच एकलें जाणें

मी कर्तव्यीं रमलेलों-देशाच्या कामीं आलों ३

ना प्रभाव या हातांचा-सारा जननी-दुग्धाचा
ना विक्रम मद्देहाचा-आर्यांच्या कुलकीर्तीचा
नाचविला भगवा झेंडा-ज्यांनीं शिवछत्रपतींचा

मातापितरांची प्रीती
त्यांच्या ठायीं मद्भक्ती
तुटली उभयांची ग्रंथी

सेवेला त्यांच्या मुकलों-देशाच्या कामीं आलों ४

एकुलता होतों एक-मातापितरांनों तुमचा
कोमल हृदयाची भगिनी-बंधु मी एक प्रेमाचा
ऐकतांच मन्निधनाला-लोटेल पूर बाष्पाचा

पृथ्विराज पडला जेथें
तानाजी निजला जेथें
दाखवून निज शौर्यातें

स्वातंत्र्य-रणीं त्या निजलों-देशाच्या कामीं आलों ५

मंदारपुष्पनवमाळा-घेवोनी निर्जरबाला
खेळवीत निजहास्याला-दाखवित भ्रुकुटी-लीला
वाद्यांच्या घेऊन ताला-वाजवीत घुंगुरमाळा
आला हा त्यांचा मेळा
दिसतसे स्पष्ट नयनांला
मित्रा ! जननीजनकाला—
जा कळीव; ‘ स्वर्गी गेलों-देशाच्या कामीं आलों ’ ६

हृदयावर ठेवुन हात-शोकानें विठ्ठल तात
वर आकाशीं पाहात-वदला गद्गद कंठांत
‘ बाळा ! ’ राखोनी नांव-केलें मज धन्य जगांत
देशाची आज्ञा होतां
जे केवळ प्राणाकरितां
कचरतील लढतां लढतां
तत्क्षणीं वाणी खेळो—‘ देशाच्या कामीं आलों ’ ७

## परीक्षा पास झाली; पण पुढें काय ?
## " दास्य हेंच ना त्वद्ध्येय ?"

जाहली परीक्षा पास-ऐकिली मीहि ती वार्ता
नवसास पावला देव-झाली ती श्रमसार्थकता
' कृतकृत्य जाहलों ' ऐसें-गमतें आजी त्वच्चित्ता
रात्रीचा करुनी दिवस
गणितां न नेत्र विकृतीस
जपतां न तेंवि प्रकृतीस
मिळविलें यश परी हाय !-दास्य हेंच ना त्वद्ध्येय ? १

कारागृहिं पडली आई-पाहते दीनवदनानें
भाळास लावुनी हात-न्हाते ती अश्रुजलानें
तोडून कडाकड बेड्या-फेंकाव्या निजहस्तानें
ऐशा निकराच्या वेळीं
दुःखाची पेटे होळी
जन्मभूमिची आरोळी
तुज अरण्यरोदन होय-दास्य हेंच ना त्वद्ध्येय ? २

देशानें आशा केली-' फिरवील दिवस हा माझे '
जन्मभूमि वांछित होती-' उचलील संकटीं ओझें '
राष्ट्रेच्छा कीं, ' उघडील-स्वातंत्र्याचे दरवाजे '
जन्मलास ज्या देशांत
वाढलास ज्या भूमींत
त्यांचा अभिमान तुझ्यांत
सांग ? सांग ? तरुणा ! काय ?-दास्य हेंच ना त्वद्ध्येय ? ३

बीर्नांवरचे सरदार-लढतांना पडले युद्धीं
उरलेले बघती मागें-बोलावितो तरुणां आधीं
ती कर्तव्याची हांक-स्वार्थांध तुझी पण बुद्धी
ये अशिक्षितांतहि वारें
मर्दांचा देह थरारे
घोकुनी बुकांचे भारे
तव स्वत्व लयाला जाय-दास्य हेंच ना त्वद्ध्येय ? ४

देशभक्त-चरितें ज्यांत-घोकलास ना इतिहास ?
पृथ्विराज शिवरायांनीं-मोहिलें न काय मनास ?
कर्तृत्व तयांचें तुझिया-हालवी न कां हृदयास ?
पोटासाठीं अभ्यास
बुद्धीचा तेथ विकास
व्हायाचा नाहीं खास
तव उदाहरण या योग्य-दास्य हेंच ना त्वद्ध्येय ? ५

तो प्रतापराणा तरुणा !' बी. ए. ' झालेला नव्हता
शिकून परीक्षा द्याया-' एम्. ए. ' ला बसला नव्हता
पण देशाकरितां होता-धगधगत तयांचा आत्मा
देशभक्त एकहि पुरतो
देशमुक्त करण्याला तो
इतिहास तयांचा तुज तो
श्रुत असतां निःसंदेह-दास्य हेंच ना त्वद्ध्येय ? ६

बाजी तानाजी गाजी-ते एसाजी नेताजी
संताजी आणि धनाजी-बा ! राणोजी दत्ताजी
राखोनी अपुली बाजी-खपले देशाच्या काजीं

तो उज्वलतेचा काळ
ही परवशतेची वेळ
दोहोंत घालुनी मेळ

ठरविलें तुवां अनिवार्य-दास्य हेंच ना त्वद्ध्येय ! ७

ब्रह्मचर्य देशासाठीं-गार्हस्थ्यहि देशासाठीं
विद्यार्जन देशासाठीं-द्रव्यार्जन देशासाठीं
संसारचि देशासाठीं-कांहींच न अपुल्यासाठीं

हें ध्येय असे आर्यांचें
तत्पुत्र ह्मणविणारांचें
यत्कीर्ती चपला नाचे

तत्कुलीं जन्मुनी देह-दास्य हेंच ना त्वद्ध्येय ? ८

'आचार्य' 'भट्ट' पदवींचे-विद्वान इथें बा ! होते
ज्यांच्याशीं तव विद्वत्ता-लागेल न पासंगातें
ते गुलाम होण्याकरितां-विद्या शिकलेले नव्हते

ज्योतिःशास्त्राला शिकशी
गणितांत हुषारहि ठरशी
उपयोग काय देशाशीं

ह्मणवि तूं 'भास्कराचार्य'-दास्य हेंच ना त्वद्ध्येय ९

लागली चहुंकडे आग-डोंबाळा उठला भंवतीं
आरक्त कराल ज्वाला-देहाला चाटुन जाती
काढा हो ! काढा कोणी-असहाय बंधु ओरडती

रुधिराचें होउन पाणी
जावें हृदयीं खळबळुनी
जावें जेथें धावोनी

तेथें न वाहतां पाय-दास्य हेंच ना त्वद्ध्येय ? १०

'घरभेद्या' होउन जेव्हां-करिशिल तूं बंधुद्रोह
'चुगलखोर' होउन जेव्हां-लाविशील स्वजनीं दाह
फसविशी अविश्वासीं जें-तूं राष्ट्रीयांचे देह

जैं विकाशिल अपुलें शील
तैं मान्यतेस येशील
पदव्याही तुज मिळतील

करि पुरुषार्थास अपाय-दास्य हेंच ना त्वद्ध्येय ? ११

॥ समाप्त ॥

# "कमलपराग."

कै० **गोविंदाग्रज** व **बालकवि** यांचे जिवलग स्नेहीं केशव महादेव **सोनाळकर** यांच्या भावनाप्रधान कवितांचा हा संग्रह आहे. व्यक्तिमात्राच्या अंतरंगांत उद्भूत होणाऱ्या प्रेमतरंगांतून **मनोहर सिद्धांत, सुंदर प्रमेयें, रहस्योद्भेदी तत्त्वें** यांचें यांत निदर्शन आहे. **विकारीप्रेम, शुद्धप्रेम** व **दिव्यप्रेम** अशा क्रमानें वाचकांस कवीनें **दिव्यलोकांत** नेऊन सोडिलें आहे. प्रेमाच्या या त्रिविध रूपाचें सामान्य वाचकासही ज्ञान व्हावें ह्मणून पुस्तकाच्या शेवटीं **प्रेमयोग** नाटकांतील हृदयस्पर्शी भाषेचा शेवटचा प्रवेश दिला आहे. **दोघां** प्रोफेसरची **प्रस्तावना, दोन सुंदर फोटो, तीन** रंगांत **छपाई, कापडी पुठा** व सोनेरी **एंबास किं.** १। रु०

**दु० आ० तिवारी**
**जळगांव—पू० खान्देश**

याच ग्रंथकर्त्याचीं

मुंबई विद्याखात्यानें मंजूर केलेलीं

# चार पुस्तकें.

१ काव्यकुसुमांजलि किं० ८१०—

प्राथमिक शाळांतून लायब्ऱ्यांकरितां मंजूर, मध्य-प्रांत वऱ्हाड इकडेही मंजूर ' दक्षिणाप्राईझ कमेटीनें बक्षीस दिलें आहे.

२ काव्यरत्नमाला—किं० २॥ रु.—

हायस्कूलांतून बक्षिसाकरितां व सर्वप्रकाच्या शाळांतून लायब्ऱ्यांकरितां मंजूर. या २५० पृ. च्या पुस्तकांत रंगित चित्रबंधअलंकार, अंतर्लापिका, बाहिर्लापिका, समस्यापूर्ति व रोमांचित करणारीं संग्रामगीतें आहेत.

३ मनोहरलीला } खंडकाव्यें प्र. किं. ८६, प्राथ-
४ प्रसन्नराधा } मिक शाळांतून बक्षीसाकरितां व लायब्ऱ्यांकरितां मंजूर.

दु० आ० तिवारी,
जळगांव—पूर्व खानदेश.

# अमृत-तुषार.

अर्थात्

# आत्म्याचे बोल.

वेदांताचीं गहन आणि उदात्ततत्वें उदाहरणांनीं, दृष्टांतांनीं व रूपकांनीं इतकीं सुलभ केलीं आहेत कीं, त्यामुळें हें पुस्तक व्यवहारज्ञास संग्रहणीय झालें आहे. केसरी, स्वराज्य, प्रबोध यांचे उत्कृष्ट अभिप्राय.

अजमीर कालेजाचे प्रो. ओक, हे या पुस्तकाचें इंग्रजींत भाषांतर करीत आहेत. किं. ट हं. सह १। रु.

२ सोनाळकरांची समग्र कविता. प्रस्तावनाकार प्रो. ओक महाराजा कॉलेज—जयपूर.

के. एम्. सोनाळकर—वकील.
जळगांव, पू० खानदेश.

2386

# भजनसाम्राज्य

किंवा

## भाविकांचा विश्रांतिकुंज.



REFBK-0002347

संग्रा[illegible] गो० सडेकर खानापूर ( बेळगांव ) किं. ०१२. महाराष्ट्रीय संतांचीं निवडक पदें, अभंग, श्लोक, भूपाळ्या, मोठ्या कसोशीनें वेंचून सडेकर यांनीं हा वि. कुं. तयार केला आहे. परमेश्वराचें नाम आळवून भक्तिरसांत दंग होण्याला या विश्रांति कुंजाचा पुष्कळ उपयोग होईल.

केसरी २५।९।२३.

सूचना-ट. ख. सह ०१४ ची व्ही. पी. केली जाते.

पत्ता:-द. गो. सडेकर पो. खानापुर-बेळगांव.